
# दुरुस्त्या

**( दोन अंकी नाटक )**

**चं. प्र. देशपांडे.**



# दुरुस्त्या

**( दोन अंकी नाटक )**

**-- चं. प्र. देशपांडे.**

**-- अंक पहिला --**

( एक चांगले हॉटेल. सुंदर, सुखावह, रंगसंगतियुक्त आणि मोहक प्रकाशयोजना असलेले. दोघांसाठी असलेले एक छान टेबल, उत्तम खुर्च्या.

अनुराग येतो. सावकाशपणे. थोडे इकडेतिकडे पाहतो. बसतो. )

अनुराग : रीतीला धरून आहे -- पुरुषानं जरा आधी येऊन वाट पाहायची. ( प्रेक्षकांना -- ) हे आहे हॉटेलच पण तुम्ही म्हणाल, मग वेटर कुठाय ? तर होता एक वेटर. पण, एक प्रॉब्लेम झाला. या सीनमध्ये जाताना आम्ही त्याला शंभर रुपये टिप देतो, असे आहे. पहिल्याच प्रयोगात त्यावरून भांडण झालं. निर्मात्यानं त्याचं पाकीट देताना ते शंभर वजा करून बाकीचे ठरल्याप्रमाणे दिले. तर हा म्हणाला, असं नाही चालणार. टिप ती टिप, ती अशी परत घेता येणार नाही. ठरलेले पैसे पूर्णच द्या, म्हणाला. निर्मात्यानं त्याला दिला हाकलून. हे नाटक आहे म्हणाला, खरं हॉटेल थोडंच आहे, आणि त्याला खरी सर्व्हिस थोडीच द्यायची आहे ?! नंतर कळलं की एरवी त्याच्या खऱ्या आयुष्यातही तो एक वेटरच होता ! निर्माता म्हणाला की कटकटच नको -- हे एक नाटक आहे, हे लोकांना आधीच सांगून टाका -- ते थोडी कल्पना वापरतील -- नाही तरी त्या वेटरला काम तरी कितीसं होतं ? जाने दो उसको ! आणि ठीक आहे ना -- थोडी कल्पना वापरत नाटक पाहायला जास्त मजा येईल ! वाटल्यास आम्ही थोडा माईम करू – म्हणजे मूकाभिनय ! ( काही क्षणांनी अंतरा येते. ) हं, ये, मीच अनुराग -- फोटो पाहिलेलेच आहेत आपण

एकमेकांचे --

अंतरा : होय -- मी अंतरा --

अनुराग : फोटो सुंदर आहे, हे म्हणालो होतोच -- आता प्रतिमेहुनि प्रत्यक्ष अधिकच --

अंतरा : हं, हं -- असू दे -- जास्त वेळ नाही ना झाला ? -- मी वेळेतच आलेय म्हणा --

अनुराग : चॅटिंगमधून पूर्ण कळत नाही आणि बोलण्याइतकं जिवंत तिथं टाईपही होऊ शकत नाही -- शिवाय बोलण्यात मजकूरही खूप जास्त येऊ शकतो -- उत्स्फूर्ततेनं बोललं जातं --

अंतरा : ते ठीक आहे, पण मी फार आशावादी नसते --

अनुराग : का गं ? असं का ?

अंतरा : कळेलच ना बोलण्याच्या ओघात --

अनुराग : पण, आधीच ठरवून, शेवटी वाटच लावायचीय, असं नको --

अंतरा : तसं नाही रे -- बोलू या --

अनुराग : पण, फारसं निराशावादी नाही चाललेलं -- हे तर दिसतंय --

अंतरा : कसं काय ?

अनुराग : ड्रेस छान आहे तुझा -- मी सांगितलेला माझा आवडता रंग --

अंतरा : ए, तसं काही नाही हं -- मी विसरूनही गेले होते -- हाताला येईल तो घेतला --

अनुराग : ठीक, ठीक -- तसंही असेल -- नो प्रॉब्लेम --

अंतरा : तसं तर ना -- पर्याय असतातच प्रत्येकापुढं -- म्हणजे व्यक्तींचे असं नव्हे -- मार्गांचे --

अनुराग : म्हणजे ?

अंतरा : म्हणजे -- लग्न करणे, न करणे, लिव्ह इन, उशिरा करणे -- असे पर्याय --

अनुराग : मला मात्र करायचंच आहे लग्न -- तेही ' लग्नच ' आणि फारसा उशीर न करता --

अंतर : हं -- ओके --

अनुराग : पण, पर्याय कमी म्हणजे माझी बाजू वीक, असं काही नाही --

अंतरा : माझं काहीच म्हणणं नाहीय --

अनुराग : मी व्यक्तींचे पर्याय पाहू शकतो -- ही नाही, ती -- असे --

अंतरा : अरे, तसं नाही -- जाऊ दे ते --

अनुराग : तुझ्या घरच्यांना माहिती आहेत का तुझ्या अपेक्षा ?

अंतरा : हे असं घरच्यांना नको गुंतवायला यात --

अनुराग : मला नाही काही प्रॉब्लेम -- आमच्या घरात आमच्या अपेक्षा जुळतात बऱ्याचशा --

अंतरा : चांगलं आहे -- ती पिढी वेगळी आहे -- आताचे विचार, गरजा त्यांना कळतीलच, असं नाही --

अनुराग : ते तर आहेच -- पण, आमचा एकत्र राहायचा विचार आहे --

अंतरा : ते ठीक आहे --

अनुराग : आपलं चॅटिंग, फोटो आणि आता तुला पाहिल्यावर जे वाटलं ते -- मी पॉझिटिव्ह आहे --

अंतरा : बोलू जरा वेळ --

अनुराग : यापुढच्या काळात मुलीच ठरवणार अटी आणि शर्ती, असं दिसतंय --

अंतरा : मुलीकडच्यांनी पसंती दर्शवून मुलाकडच्या पसंतीची वाट पाहायची हे संपणारच ना कधीतरी --

अनुराग : होय -- मान्य --

अंतरा : नीट माहिती असणं आणि अगदीच न जमणारं काही नाही ना, हे पाहिलेलं असावं --

अनुराग : होय --

अंतरा : भोळेपणानं कुठंतरी ठरवून मग भांडणं करत बसायची वेळ येऊ नये --

अनुराग : खूप चिकित्सा करायचा माझा स्वभाव नाहीय --

अंतरा : आता तुझे वा माझे काही ब्रेकप्स झालेयत का, त्यांची काय परिस्थिती आहे, त्यातलं मनात काय शिल्लक आहे, काय घडू शकेल -- हे कुठं काय माहीत आहे आपल्याला ? ते बोललं जायला हवं --

अनुराग : काळाचा महिमा ! पूर्वी ब्रेकप हा शब्दच नव्हता -- लफडेबाज -- हाच शब्द !

अंतरा : तुझं नाहीय ना तसं ? कारण मी ब्रेकपवाली आहे -- ( शांतता ... ) आज आमच्याकडं नवीन टीव्ही आणि होम थियेटर आणलं --

अनुराग : पिक्चर्स खूप पाहतेस का ?

अंतरा : हं -- पाहते कधीकधी --

अनुराग : आमची राहणी फार सधन म्हणावी, अशी नाहीय --

अंतरा : ते ठीक आहे -- ते बदल होत जाऊ शकतात -- माझे वडील सरकारी अधिकारी आहेत आणि मी एकटीच मुलगी ! भाऊबहीण कुणी नाहीय ! त्यामुळे खूप लाड आणि तडजोडींची गरजच नाही -- अशी वाढलेय मी -- म्हणजे उदाहरणार्थ सकाळी मला हवं असताना टॉयलेट बंद असलं तरी माझी चिडचिड होऊ शकते -- अर्थात आम्हीही मध्यमवर्गीयच आहोत --

अनुराग : ते काय, दोन तरी टॉयलेटस असतातच फ्लॅटमध्ये --

अंतरा : म्हणजे तेच फक्त, असं नाही -- एकूणच --

अनुराग : माझ्या एका ब्रेकपचं सांगतो आधी --

अंतरा : हं -- सांग --

अनुराग : एका मुलीशी माझं बऱ्यापैकी म्हणजे खूपच जमलं होतं -- ती सुंदरही होती --

अंतरा : हं --

अनुराग : संधी मिळेल तेव्हा स्पर्शसुखांचे खेळ, चुंबनं -- हेही होत असे --

अंतरा : हं --

अनुराग : पण, यापुढे नाही -- ते ठीक -- प्रॉब्लेम वेगळाच झाला --

अंतरा : हेच समजायला हवं -- माझ्याही निर्णयाला ते उपयोगी पडू शकतं --

अनुराग : ओघाओघात असं समजलं की ती शिर्डीचे साईबाबा आणि नरसोबाच्या वाडीचे दत्त यांची भक्त आहे ! आता हे काय काँबिनेशन होतं -- बाबा आणि दत्त -- हे मला अजूनही समजलेलं नाहीय --

अंतरा : असू शकतं काहीही --

अनुराग : होय -- ते बरोबर आहे -- पण, प्रत्येक वर्षी या दोन्ही ठिकाणी एकेकदा जाऊन यायचेच अशी तिची पक्की इच्छा आणि निर्धार आहे -- मला ही फालतूगिरी वाटते --

अंतरा : गेली असती तिची ती किंवा कुणाला बरोबर घेऊन --

अनुराग : हे एवढंच नाही राहात मग -- आनुषंगिक बरंच येणार त्याबरोबर -- मला हे नसतं जमलं --

अंतरा : मग ?

अनुराग : सांगून टाकलं -- हे बंद होणार असेल तरच पुढे जाऊ अन्यथा बास -- अर्थातच यावर संपलंच ते --

अंतरा : वा ! हे तर छानच ! यामुळं माझ्याकडचे तुझे मार्क्स वाढले समज ! मला तर, तीर्थयात्रा वगैरे तर जाऊच दे, देवांचे पंधरा फोटो आणि पंधरा मूर्त्या असलेला देव्हारा ज्या घरात आहे, ते घरही चालणार नाही --

अनुराग : मलाही नाही आवडत ते -- आमच्याकडे आई किंवा बाबा करतात पूजा -- मी कधीच नाही करत --

अंतरा : आमच्याकडे आईच -- वडील नसतातच ना इथे बऱ्याचदा --

अनुराग : हं --

अंतरा : आता माझ्या ब्रेकपचं सांगते --

अनुराग : हं --

अंतरा : ब्रेकप असं नाही म्हणता येणार बहुतेक त्याला कारण लग्नाचा वगैरे विचार नव्हताच त्यात -- नुसतंच मोहात पडणें होतं -- लग्न झालेला होता तो -- दोन छोटी मुलंही असलेला --

अनुराग : अच्छा --

अंतरा : पण मग पुढं पुढं तो कौटुंबिक गोष्टींत खूप अडकू लागला -- मला त्याचा वेळ मिळणं कमी होऊ लागलं -- त्याला कौटुंबिक घडी विस्कटू द्यायची नव्हती -- त्यामुळं, चोरून-लपून आमचे एकत्र येणं थांबवणंही भाग होते -- मग, ठरवून ते सगळं थांबवायचा निर्णय घेतला आम्ही -- मनानं एकमेकांचं असणं खूप एंजॉय केलं आम्ही पण शरीराचं म्हणशील तर तुझ्यासारखंच -- सगळे स्पर्श आणि चुंबनं --

अनुराग : म्हणजे कोणत्याही वादामुळं वा खटक्यामुळं तुम्ही वेगळे झालात असं नाही --

अंतरा : नाही -- फक्त व्यावहारिक अडचणी --

अनुराग : मग, एक प्रश्न उरतो -- पुन्हा समजा तो आला समोर -- त्याच प्रेमानं -- तर ?

अंतरा : एक तर आता तसं होणार नाही -- दुसरं म्हणजे तो इथं नसतोच आता -- त्याची बदली झालेली आहे – आणि जे संपलं ते संपलं -- नाही तर नव्या निर्माण केलेल्या नात्याशी ती प्रतारणा होईल --

अनुराग : पण, मनात काही चांगल्या आठवणी राहणारच --

अंतरा : होय -- पण, त्यानं कुणाला काय फरक पडणार आहे ?

अनुराग : त्या प्रमाणात तुझ्या मनाचा काही भाग नव्या नात्याला मिळणार नाही --

अंतरा : असं तर सगळयांचंच असू शकतं -- न बोलता -- आणि नुसतं प्रेम म्हटलं तर कुणीही दोनतीन व्यक्तींवर तरी पूर्ण शंभर टक्के करू शकतो आलटून पालटून -- थोडं मन मागं राहिलं, असं काही होत नाही -- प्रश्न वेळेचा असणार -- हे निभावायला इतका वेळ कोण घालवू शकेल ? नुसतं मस्त प्रेमच म्हणतेय फक्त -- सगळीकडे झोपणं नव्हे -- तरीही ते जमणार नाही --

अनुराग : ते बरोबर आहे -- एक तर मलाही जाणवतंच -- सगळेच स्त्री-पुरुष एकमेकांशी हसून-खेळून, नजरेतून थोडं प्रेमही व्यक्त करत जगू लागले तर सगळयांचंच जगणं रिच होत जाईल -- सध्या बऱ्याच वेळी एकमेकांतला पझेसिव्हनेस याच्या आड येत असतो --

अंतरा : वा ! मस्त ! छान बोलतोयस !

अनुराग : बहुतेक स्त्रिया या छान, लोभस असतात --

अंतरा : आणि पुरुषही -- मनं हावरट, खत्रुड नसली तर --

अनुराग : ब्रेकपची किंवा घटस्फोटाची काही कारणं मजेदार असतात -- एक प्रसिद्ध उदाहरण असं आहे की, नवरा खूप घोरतो, त्यामुळं तिला झोप मिळत नाही आणि त्याचा तिच्या तब्येतीवर परिणाम होतो, म्हणून घटस्फोट घेतला ! -- आणि दुसरं जरा एक वेगळं उदाहरण म्हणजे, नवऱ्याला सारखी नाकात बोटं घालून नाक साफ करत राहायची सवय होती !

अंतरा : एकाच्या बायकोला जेवताना ढेकर द्यायची सवय होती -- ते त्याला सहन न झाल्यामुळं त्यांचा घटस्फोट झाला ! आणि एकीला सारखंच डोक्याच्या केसांत खाजवायची सवय होती !

अनुराग : किरकोळ काही आवडीनिवडींमुळंही तुटत असतील काही संसार --

अंतरा : काहीजण म्हणतात की स्त्रियांमुळंच होतात जास्त घटस्फोत -- पण, ते खोटं आहे -- स्त्रिया शिकल्या, सक्षम झाल्या, स्वावलंबी झाल्या, त्यांचा आत्मविश्वास वाढला की त्या विचारीही होणारच ना -- पूर्वीसारखं, कसंही असलं तरी ओढत, रेटत का राहतील ?

अनुराग : होय, खरंच आहे हे --

अंतरा : बर ते ठीक, कशी असावीशी वाटते तुला तुझी बायको ?

अनुराग : सिंपल आहे ! मला ती आकर्षक वाटली पाहिजे आणि ती बुद्धिमान असायला पाहिजे -- माझ्या बोलण्यातल्या गंमती आणि चावटपणाचे प्रकार तिला समजायला हवेत -- मुख्य म्हणजे संबंधांच्या वेळी सगळया गोष्टींची मजा समजणारी आणि त्या एंजॉय करू शकणारी असावी -- हे एवढं मुख्य -- मग बाकीचं म्हणजे समजुतदार असणं, भांडखोर नसणं आणि स्वीकारलेल्या नात्याची किमान शिस्त पाळणं -- बास -- आणखी काय ? !

अंतरा : बहोत खूब ! आणि घरकाम करणारी ? नोकरी ?

अनुराग : असं सगळं बाकीचं थोडेफार ॲडजस्ट करत जायचं --

अंतर : ती अपेक्षा तर माझीही आहेच -- नवरा डल -- बुद्दू नसावा -- एंजॉय करू शकणाराच असावा -- नुसती यांत्रिक उरकाउरकी नसावी -- एरवीही मी काय बोलतेय हे त्याला समजावें --

अनुराग : मग, वाटतोय का मी पुरेसा बुद्धिमान ?

अंतरा : बोलण्यावरून कळतंयच ना -- यू आर ओके -- शिवाय तू जेकेही थोडेफार वाचलेले आहेस -- आपल्या चॅटिंगमध्ये हे आलं होतं --

अनुराग : फार नाही -- थोडे --

अंतरा : ते ठीक आहे --

अनुराग : काय काळ आलाय च्यायला -- आता मुलीच्या आहेत या स्पष्ट अटी ! -- मला एक सांग, संबंधाच्या वेळी कोण कसं आहे, हे कसं कळणार ? की ट्रायलच घ्यायची सरळ ?

अंतरा : खरं तर घ्यायला हवी पण, निदान हे बोलून तरी ठेवायला हवंच --

अनुराग : याच्या जर ट्रायल्स घ्यायची पद्धत पाडली तर लग्नच करणार नाहीत काहीजण -- नुसत्याच ट्रायल्स घेत बसतील !

अंतरा : एवढ्यात तरी ही पद्धत येईलसं वाटत नाही --

अनुराग : आमच्या ऑफिसातल्या एकाचं लग्न होतं -- योगायोग असा झाला की त्याच वेळी ऑफीसच्या एका ट्रेनिंगला त्याची निवड झालेली होती -- ट्रेनिंग संपल्यावर लगेच त्याला जोडून त्याची लग्नाची रजा सुरू झाली -- ते सगळे आटोपून तो हजर झाला -- एका ग्राहकानं त्याला सहज विचारलं, बरीच मोठी रजा मारली लग्नासाठी ? तर तो म्हणाला, नाही, आधी पंधरा दिवस ट्रेनिंगला गेलो होतो ना -- तर तो ग्राहक म्हणाला, बरंय राव, तुमचं ऑफीस लग्ना आधी ट्रेनिंग देतं ! तर हा म्हणाला, अहो, ते ट्रेनिंग असतं तर लग्न कशाला केलं असतं हो ?

अंतरा : ( हसून -- ) मस्त ! -- मला एक सांग -- हे असं बोलून, समजून घेऊन होणाऱ्या नात्याला जास्त सुरक्षितता, जास्त चांगलेपणा येईल की नाही ?

अनुराग : नक्कीच ! पण, जगण्यातल्या अनिश्चिततेचा भाग कधीच पूर्ण टाळता येणार नाही -- तो असणारच – तरीही, अनिश्चितता आहे म्हणून काही कसंही, निष्काळजीपणानं वागावं, जगावं, असंही नाहीच ना -- लग्नामुळं जगण्यात एक नवं नातं स्वीकारणं म्हणजे आयुष्यात एक नवी वस्तू घेण्यासारखंच आहे -- पाहून-पारखूनच घेतलं जाणार -- तेच योग्यही आहे --

अंतरा : आत्तापर्यंत तरी स्मूथ चाललाय संवाद -- की आहे तुला काही खटकण्यासारखं ?

अनुराग : स्मूथच आहे -- काहीच प्रश्न नाहीय -- आणि माझं मनच तुझ्या बाबतीत अनुकूल झालंय -- ते आता विचलित व्हायची शक्यता नाही -- निर्णय तुझाच काय होईल तो --

अंतरा : मला जे मुख्य हवंय त्यासाठी माझ्या वाचनात आलेला एक सल्ला सांगते --

अनुराग : हं -- सांग --

अंतरा : सल्ला असा आहे की मी माझ्यापेक्षा वीस वर्षांनी मोठ्या असलेल्या पुरुषाशी लग्न करावं --

अनुराग : का, असं का ? मी तर आहे त्याहून जास्त वयाचा होऊ शकणार नाही --

अंतरा : तू हो, असं नाही रे -- एक सांगितलं --

अनुराग : का पण असं ? कशासाठी ?

अंतरा : म्हणजे मी जेव्हा चाळीसची असेन तेव्हा तो निवृत्त होईल --

अनुराग : तसं होणारच ना, असं असल्यावर --

अंतरा : तिथून पुढंच करिअरमध्ये मोठ्या संधी येतात -- मोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या जाऊ शकतात -- त्या मला सहज घेता येतील -- नवरा निवृत्त घरी असेल --

अनुराग : मला वाटतं, अयोग्य होईल हे -- एरवीही जमवून घेता येईलच ना --

अंतरा : तसं करायचंच असं नाही -- एक आपलं विषयाला सुरुवात केली -- माझंही मन अनुकूल झालेलं आहेच तुझ्याबद्दल, पण, मुख्यच जमणार नसेल तर मग इलाज राहणार नाही --

अनुराग : मला नाही कळलं --- नीट सांग --

अंतरा : लोक म्हणतात की स्त्रीला मातृत्वाशिवाय पूर्णत्वच येत नाही -- मला नाही हे पटत -- हे ठरवून स्त्रीच्या डोक्यावर हॅमर केलं जातं आणि मग ते तिलाही खरं वाटायला लागतं --

अनुराग : पण, काय, प्रॉब्लेम काय आहे ?

अंतरा : प्रॉब्लेम काहीच नाहीय -- हवी तेवढी मुलं जन्माला घालू शकते मी --

अनुराग : मग ?

अंतरा : तुला काय वाटतं की मातृत्व म्हणजेच स्त्री ?

अनुराग : आता कसं आहे -- यातलं शास्त्रीय सत्यबित्य काही असेल तर मला ते माहीत नाही -- आणि स्त्रीच्या मनाचा डायरेक्ट अनुभव तर मला कधीच येऊ शकणार नाही --

अंतरा : मी सांगते ना -- खोटं आहे ते --

अनुराग : असेल --

अंतरा : समजा अशी वेळ आली की मला त्या वेळी कुणी विचारलं की मुलं किती तुम्हाला ? -- तर अजिबात खंत न वाटता, एकही नाही, असं मी सांगू शकेन --

अनुराग : का पण ? प्रॉब्लेम काय आहे ?

अंतरा : पुरुषाचं काय असतं, तुझ्या मते ? तोही पितृत्वाविना अधुरा असतो का ?

अनुराग : मलाही काही नाहीय प्रॉब्लेम -- कितीही होऊ शकतील -- पण, तू म्हणतेयस या प्रश्नाचा मी विचारच नव्हता केला -- पण जे असेल ते असेल -- पाहता येईल --

अंतरा : मुलांची आडनावं कोणती लावायची, असेही प्रश्न येऊ शकतात -- फक्त मुलामुळे मुलाकडचंच वंशसातत्य चालतं, असे का ? मुलीमुळे मुलीकडचे का चालू नये ?

अनुराग : नुसती एक परंपरा असावी --

अंतरा : त्याच्या पुढचा प्रश्न म्हणजे हवंय कशाला वंशसातत्य ? एवढ्या मोठ्या विश्वात कोण तुम्ही ? कुणाचा वंश ? आपण उगीचच भावनिक महत्त्व देत बसतो या निरर्थक गोष्टींना --

अनुराग : ते ठीक आहे -- पण, सगळंच निरर्थक असेल तर लग्न हवंय तरी कशाला ? मी इथे आलोय ते जमलं तर आवडेल म्हणून -- तू मला भलतंच काही पटवून देतेयस --

अंतरा : नाही, पटवत नाहीय काहीच -- एक विचार चाललाय --

अनुराग : जमलं समजा आपलं तर लग्न करायचा विचार आहे ना तुझा ? की नाहीच ? मग भेटलोय कशाला आपण ?

अंतरा : लग्न करायचं आहेच रे --

अनुराग : कशसाठी ?

अंतरा : एक सेफ घर असावं, आपल्या जगण्यात सामील असणारं प्रेमाचं कुणी असावं, -- हे असणारच ना – हे तर स्त्री असो की पुरुष, दोघांनाही हवंच असतं --

अनुराग : मान्य --

अंतरा : जे. कृष्णमूर्ती म्हणतात की सातत्य हे फक्त विचाराला असतं आणि विचार ही एक अत्यंत मर्यादित, आत्मकेंद्रित गोष्ट असते -- त्रासदायक गोष्ट असते -- आकलन म्हणजे विचाराच्या मर्यादा ओलांडणं -- सातत्याची हाव, सुरक्षिततेची हाव -- हे सगळे विचार असतात --

अनुराग : सॉरी -- हे नाही मला आत्ता समजू शकत --

अंतरा : जगण्यातल्या सगळया प्रश्नांवर जेके बोललेले आहेतच --

अनुराग : इथे बसून आपण काय शोधतोय मग ? सुख, सातत्य, आधार, प्रेम -- हेच ना ?

अंतरा : बरं, जाऊ दे ते --

अनुराग : तुझं म्हणणं तरी काय आहे ? नीट कळू दे ना --

अंतरा : मला माझ्या करिअरला महत्त्व द्यायचं आहे -- मोठ्या जबाबदाऱ्या घेत मोठ्या पोस्टवर पोचायचं आहे -- मी एक बुद्धिमान स्त्री आहे तर परंपरेनं हॅमर केलेल्या जगात मी स्वत:ला जखडून घेणार नाहीय --

अनुराग : ठीक -- म्हणजे ?

अंतरा : एकाग्रता, निष्ठा आणि आच हे असल्याशिवाय ते घडू शकत नाही -- याला अडथळे होणाऱ्या गोष्टी मला नको आहेत --

अनुराग : ओके -- म्हणजे काय व्यवहारात -- कसं असायला हवंय, ते सांग --

अंतरा : मला लग्न करायचंय पण मूल नकोय -- ती हगणीमुतणी, आजारपणं, श्रीगणेशा आणि एबीसीडी, ठिकठिकाणच्या डमिशन्स, अभ्यास आणि आनुषंगिक असंख्य प्रश्न यांत मला माझा वेळ आणि शक्ती घालवायची नाहीय -- हे बरोबर आहे का, वगैरे चर्चा नको आहे, कारण हे माझं ठरलेलं आहे -- आणि अमुक म्हणजेच बरोबर, असं काही नसतं -- ज्याचं त्याचें आपापलं वेगवेगळं जगणं चालू असतं --

अनुराग : हं --

अंतरा : असं चालणार असेल तर आणि तिथंच मी लग्न करेन --

अनुराग : आणि मोठं पद मिळवणं किंवा कर्तृत्व गाजवून दाखवणं -- अशा महत्त्वाकांक्षेबद्दल काय म्हणतात जेके ?

अंतरा : तसं काही नाही -- माझ्यात असलेल्या कुवतीसह मला जगायचं आहे. एवढंच --

अनुराग : आणि मग तुझ्याबरोबर जगणाऱ्यांना काय वाटतंय, याचा तू विचार करायची तुला गरज नाही --

अंतरा : माझी सक्ती नाही -- माझी निवड मी करणार, इतकंच --

अनुराग : आता हा प्रश्न मी आत्ताच ऐकतोय -- खरं तर मला तू खूप आवडलेली आहेस -- चॅटिंगमधूनच आवडली होतीस आणि आता भेटून तर खूपच -- पण, या सगळयाचे इतरांवरही काय परिणाम होतील त्याचा विचार करावा लागेल, असं वाटतंय -- पण, समज, हा सगळा विचार झाल्यावरही मी तुला ' हो ' म्हटलं तर तुझा काय असेल निर्णय ? स्पष्टच म्हणजे, मी आवडलोय का तुला ?

अंतरा : मला तू आवडलेला आहेसच -- माझा अर्थातच होकार असेल --

अनुराग : ही गोष्ट मला माझ्या आईवडिलांशी बोलणंही अवघड आहे -- मला तू हवी असणं म्हणजे हे बिनमुलाचं त्यांना काहीच न सांगणे -- कारण ते नातवंडांची वाट पाहणार, हे नक्कीच आहे -- तुझ्या आईवडिलांच्या बाबतीत तू काय केलंस ?

अंतरा : त्यांना सांगितलंय मी -- नाराजीनं का असे ना, माझे लाड करणं चालूच ठेवणार आहेत ते --

अनुराग : याचा अर्थ -- निर्णय आता फक्त माझ्यावरच आहे -- तुझ्या बाजूनं तू क्लियर आहेस -- तुला काहीच प्रश्न नाहीय --

अंतरा : बरोबर --

अनुराग : तरीही, मूल होऊ द्यायचं, पण, तुला त्याचा त्रास होऊ नये, तुझा वेळ त्यात जाऊ नये, अशी व्यवस्था करायचा काही मार्ग सापडत असेल तर ?

अंतरा : तसा काही मार्ग असू शकत नाही -- भ्रमात राहण्यात काहीच अर्थ नाही --

अनुराग : हे कसं होतंय -- समजा मी एखादा टीव्ही किंवा फ्रिझ घ्यायला गेलो मार्केटात -- साधारण काय, कसं हवं हे ठरलेलं असूनही, ते सोडून, दुसरंच काही विचारात पाडतंय आणि घ्यावंसं वाटतंय -- जे हवंसं वाटत होतं ते मागं पडतंय --

अंतरा : नाही तरी नवं नातं म्हणजे एक मशीनच तर असतं -- बिघडलं तर दुरुस्तही करावं लागतं -- तडजोड करणं, प्रेमानं वा रागावून ते नीट करायचा प्रयत्न करणं -- हे दुरुस्तीचेच तर प्रकार असतात --

अनुराग : हा असला काही प्रॉब्लेम नसता तर लगेच इथल्या इथंच शिक्कामोर्तब झालं असतं -- आणि मग हा क्षण साजरा करण्यासाठी एक मस्त चुंबन घेतलं असतं तुझं --

अंतरा : ते तर तू आताही घेऊ शकतोस -- छानच आहेस तू --

अनुराग : हे सगळं सध्या स्थगित ठेवून -- कारण मला थोडा विचार करावा लागेलच -- ( दोघेही जवळ येतात. तो काही क्षण तिच्या डोळयांत पाहतो. मग आसुसून चुंबन घेतो. ) छान आहेस तू --

अंतरा : या चुंबनाच्या जाळयात तुला अडकावायचा हा मुळीच प्रयत्न नाहीय -- फ्री दिलंय तुला -- तू चांगला आहेस, मला आवडलायस म्हणून -- आणि बिल मी देतेय --

अनुराग : होय -- पुरुषानंच बिल द्यावं, असं काही नाही --

अंतरा : कधी कळेल मला ? पुन्हा तीच जुनी स्थिती आली -- मुलीकडच्यांनी मुलाकडच्या होकाराची वाट बघत बसणं --

अनुराग : हा प्रश्नच वेगळा आहे -- आणि उद्याच सांगेन -- ( आता तिच्या हाताचे चुंबन घेतो. ) चल, निघू या --

अंतरा : चल -- ( जातात. )

( अनुराग -- ३३ आणि अंतरा -- ३१ हे जोडपे. त्यांचा फ्लॅट. आर्थिक सुस्थिती. रात्री सुमारे ९.३० ची वेळ. पडदा उघडतो तेव्हा समोर कुणीच नाही. काही क्षण जातात. नंतर अनुराग आणि अंतरा स्वैपाकघरातून बाहेर येतात. दोघेही वरवर पाहता खुशीत आहेत. समोर आहेत तेवढेच प्रश्न आहेत असे तिचे वागणे, पण, त्याव्यतिरिक्त मनातही काही ताण आहेत असे अनुरागचे वागणे.)

अनुराग : मजा येते. दोघांनी पटापट स्वैपाक करायचा, पटापट जेवायचं आणि पटापट आवरून बाहेर यायचं ! रिअली अ लक्झुरिअस लाईफ !

अंतरा : मजा येते हे ठीक आहे पण हे लक्झुरिअस नाही तर फक्त लेजिटिमेट लाईफ आहे ! रोजी तीस तीस, पन्नास पन्नास हजार खर्च करणारे लोक आहेत हे आपल्याला माहिती आहे !

अनुराग: मी हॅपीनेसबद्दल बोलतोय !

अंतरा : हॅपीनेस न्ड चैन आर टू डिफरन्ट थिंग्ज !

अनुराग: आपले मतभेद आहेत पण वुई लव्ह इच अदर !

अंतरा : व्हेरी गुड !

अनुराग : लक्षात घे. तू आधुनिक असूनही थोडीफार ट्रॅडिशनल आहेस. दारू पीत नाहीस. पण मी पितो याचा

तुला राग नाही एवढा आधुनिकपणा तुझ्यात आहे. पण तू याला पुरुषप्रधानता म्हणत नाहीस ही तुझी ओरिजिनॅलिटी आहे ! स्ट्रॅटेजी नव्हे !

अंतरा : तू माझ्या ज्या ओरिजिनॅलिटीचं कौतूक करतोयस त्या व्यतिरिक्तही बरीच ओरिजिनॅलिटी माझ्याकडे आहे याची मला समज आहे ! माईंड वेल ! मी ' समज ' म्हटलंय, नुसतं ' जाणीव ' नव्हे !

अनुराग : मला शब्दच्छलात इंटरेस्ट नाही ! हळूहळू सगळयाच भाषांमधला सूक्ष्मपणा नष्ट होणार आहे ! व्हाय वरी अबाऊट इट !

अंतरा : हे मलाही मान्य आहे ! फार सूक्ष्म अशा भावनिकपणाची काही गरज नाही ! बरं, ते जाऊं दे, लेटस बी प्रॅक्टिकल आल्सो ! कालच मी तुला सांगितलं होतं की मिक्सर दुरुस्तीला टाक !

अनुराग : सॉरी ! उद्या टाकतो ! पण तुलाही टाकता आला असता ! काल तर सुट्टी होती !

अंतरा : एकदा हे तू करायचं हे मान्य केल्यावर पुन्हा तोच विषय कशाला ?

अनुराग : ओके ! पण काय झालंय काय ?

अंतरा : बंदच पडलाय !

अनुराग : ठीक आहे ! उद्या !

अंतरा : पण मला एक सांग, भाषेचा सूक्ष्मपणा कसा काय नष्ट होईल ?

अनुराग : गरज नसल्यामुळं ! सिंपल ! भावनिक अडकून पडणंच कमी कमी होत चाललंय नं !
तू म्हणालीस तेच !

अंतरा : पण दु:खाच्या लेव्हलवर सगळा सूक्ष्मपणा चालू असतो !

अनुराग : आपापल्या दु:खाच्या ! हू बॉदर्स अबाऊट अदर्स !

अंतरा : मी निश्चितपणे तुझा विचार करते !

अनुराग : ए, जाऊं दे ! चल ! लेटस बी विथ द प्रेझेंट ! दिवस संपलेला आहे, अपमान किंवा त्रास फारसा कुठं झालेला नाही, जेवणं झालेली आहेत, सगळं आवरूनही झालेलं आहे आणि वुई आर फ्री ! हॅपी ! हेच हॅमर करू या !

अंतरा : अनुराग, बी प्रॅक्टिकल, इमोशनल नको होऊस !

अनुराग : तूही फार प्रॅक्टिकल नको होऊस !

अंतरा : तेवढं ते मिक्सरचं उद्या बघ !

अनुराग : अंतरा, आय लव्ह यू !

अंतरा : म्हणजे मिक्सरचं उद्या बघणार या अर्थी !

अनुराग : नाही, एकूणच नं !

अंतरा : दिसण्यात -- जाणवण्यात कमी पडतं रे पण कुठं तरी ! काल राहिलाच ना मिक्सर टाकायचा ! जस्टीस

मस्ट नॉट ओनली बी डन, बट इट मस्ट आल्सो पीअर टु हॅव्ह बीन डन !

अनुराग : डिपार्टमेंटल चौकश्यांची तुझी प्रॅक्टीस वाढत चाललीय, त्यामुळं, ओके ! पण, कर्मचाऱ्यांच्या विरोधात नं !

अंतरा : नाहीतरी मला शिस्तभंग करणाऱ्या, पदाचा गैरवापर करणाऱ्या, भ्रष्ट लोकांचा तिरस्कारच वाटतो ! तसंच कामचुकार आणि जबाबदारी टाळणाऱ्यांचाही !

अनुराग : आपण किती चांगले आहोत ! पहिल्यांदा माझ्या नोकरीमुळं आपण या शहरात आलो, मग तुलाही मिळाली तुला योग्य नोकरी ! आणि सुरू झाला तुझ्या करीअर प्रगतीचा चढता आलेख १ एलएलबी पूर्ण करणे, इतर अनेक परीक्षा, प्रमोशन्स ! सासुसासरेही नाहीत इथे ! फ्री !

अंतरा : पर्सोनेलमध्ये मी एक्का समजली जाते ! शिस्तभंग कारवाई या विषयात तर नावच आहे माझं !

अनुराग : नोकरी सरकारी असल्यामुळं ! खाजगीत याला कुणी भीक घालत नाही !

अंतरा : भीक ?

अनुराग : होय भीकच ! शक्यतो गुंतागुंत न वाढवता ताबडतोब न्याय देण्याकडे कल असतो त्यांचा ! म्हणजे निकाल लावण्याकडे !

अंतरा : आम्हीही जिंकण्यासाठीच लढतो पण जरा लांबच्या मार्गानं ! आणि दुसरं ! सासुसासरे स्वत:हूनच इकडे यायचं टाळतात ! माझ्या फ्री असण्याचा प्रश्न नाही !

अनुराग : तू मधेच एखादा मुद्दा उत्तर न देता सोडून दिलास, असं कसं होईल !

अंतरा : शक्य तेवढी क्लॅरिटी ठेवायलाच हवी नं !

अनुराग : बरं, वीजबिलात काहीतरी घोटाळा आहे ! एकदम चौपट कसं काय आलंय बिल ! तुला जमणार आहे का ?

अंतरा : सध्या काही चौकश्या कंटिन्यूअस चालवून लौकर संपवायचं ठरलंय ! उशिरा जाणं मला शक्यच नाही !

अनुराग : म्हणजे मीच ! ठीक आहे ! प्रेमासाठी आणखी एक अपमान ! उशीरा जाण्यामुळं होणारा ! ओके !

अंतरा : खूप वेळा तासंतास जास्तही करतोस की काम !

अनुराग जास्तीचं न मोजणं आणि कमी पडेल ते दाखवणं हेच तर बॉसच्या यशाचं रहस्य असतं ! पर्सोनेलमधल्या व्यक्तीला तरी हे सांगायला लागू नये !

अंतरा : आता वॉशिंग मशीनमधून कुठंतरी लीकेज आहे असं मला वाटतं ! मी दोनदा गपचूप पाणी पुसून घेतलं ! बोललेही नाही तुला !

अनुराग : म्हणजे तेही बघावं लागणार आहे का काय ! मला वाटतं, हे नकोत विषय ! लेटस बी हॅपी इन द प्रेझेंट ! ॲन्ड बी फिलॉसॉफिकल आल्सो !

अंतरा : जे. कृष्णमूर्ती म्हणतात लिव्ह इन द नाऊ !

अनुराग :	आणि ट्रुथ रिपीटेड इज अ लाय ! त्यांचंसुध्दा !

अंतरा :	बकवास !

अनुराग :	कुणाची ?

अंतरा :	त्यांची नव्हे ! आपली !

अनुराग :	( काही क्षणांनी --) शां ऽ त -- छान वाटतंय !

अंतरा :	( मोठ्यांदा हसून -- ) मलाही !

अनुराग :	पण इतकं हसायचं कारण काय होतं ? विनोद तर काही झालेला नव्हता !

अंतरा :	हसण्यासाठी विनोदाची काय गरज ?

अनुराग :	खरं आहे रे बाबा ! बायकांना विनोदबुध्दीचा प्रॉब्लेमच असतो ! चावून चोथा झालेला विषय !

अंतरा :	परिपक्वता ही विनोदबुध्दीपेक्षा महत्त्वाची असते ! विनोदाशिवाय हसता येण्यात परिपक्वता असते ! विनोद हा बुध्दीच्या कमीजास्त असण्यामुळं कळणं, न कळणं असा भेदभाव करतो ! विनोदाशिवाय हसण्यात समता असते !

अनुराग :	असं असेल तर मराठी सीरीयल्स, नाटकं, सिनेमे यांचे प्रेक्षक नक्कीच समता आणतील !

अंतरा :	टिंगल सोड ! आचार्य रजनीशच म्हणतात की विनोदाशिवाय हसा ! हसण्यासाठी विनोदाची गरज नाही !

अनुराग :	मी इतकं काही ते मन लावून वाचलेलं नाही ! त्यामुळं माघार ! ( काही क्षणांनी --) पण खरं आहे हं, सगळं ठीक असलं की, खरंच ,कारणाशिवायही हसावंसं वाटतं !

अंतरा :	दॅट आल्सो शुड नॉट बी अ कंडिशन ! सगळं ठीक असणं !

अनुराग :	मग, माझ्या अल्पबुध्दीप्रमाणे अशा माणसाला लोक वेडा म्हणतील ! सॉरी !

अंतरा :	तू कुणाला ’ सॉरी ’ म्हणतोयस ? मला ? की रजनीशांना ?

अनुराग :	ते तर वारलेत नं !

अंतरा :	मला ’सॉरी’ नको म्हणूस ! वाक्य त्यांचं आहे !

अनुराग	संतांची समदृष्टी ! हसा ! विनोदाशिवाय ! हे तर सगळयांनाच शक्य आहे !

अंतरा :	बॅड ज्योक ! म्हणून मी हसत नाही !

अनुराग:	अरे ! नो ज्योकला हसणाऱ्यांनी गुड ज्योक आणि बॅड ज्योक असा फरक का करावा ?!

अंतरा :	तुझ्या उथळपणात मला इंटरेस्ट नाही !

अनुराग :	हे तर मला कमी लेखणं झालं ! भेदभाव झाला ! पण, जाऊं दे ! मला चालेल !

अंतरा :	तुझं मनच मोठं आहे रे !

अनुराग :	अंतरा, हे चांगलं आहे की वाईट ? तुझ्या बोलण्यावरनं कळत नाहीय !

अंतरा : माझ्या अनुरागा, मी कौतूकच करतेय रे तुझं ! मला आवडणाऱ्यांची तू चेष्टा केलीस तरी !

अनुराग : मी चेष्टा केली ?

अंतरा : आता तुझ्या नाही ना लक्षात आलं ? बघ ! यासाठीच बौध्दिक भेदभावांना महत्त्व नको !

अनुराग : कारणाशिवाय हसू या ! ( हसतो.) हास ना !

अंतरा : रागावून नाही, आनंदानं हसलं पाहिजे !

अनुराग : बरं, जरा आमच्यासारख्या कमी परिपक्व लोकांमध्ये आज घडलेला एक विनोद सांगू का ?

अंतरा : नो प्रॉब्लेम !

अनुराग : आज आमच्या ट्रेनिंग सेंटरमध्ये पी ॲन्ड एल -- नफातोटा पत्रक -- या विषयावर लेक्चर चालू होतं – त्यानं एक छान उदाहरण दिलं ! -- इंटरेस्ट असेल तर बोलतो पुढे --

अंतरा : बोल, बोल !

अनुराग : एका कंपनीचा एक डायरेक्टर मेला तेव्हा त्याचा अंत्यविधी खर्च म्हणजे फ्यूनरल एक्स्पेन्सेस कंपनीनं केले. आता प्रश्न असा आला की हा खर्च कोणत्या कॉलममध्ये टाकायचा, कारण नफातोटा पत्रकात असा काही कॉलमच नाही. तर त्या संबंधित कारकुनानं काय केलं असेल? पूर्ण विचारांती त्यानं तो खर्च ' पॅकिंग अँड डिस्पॅच ' या रकान्यात मांडून टाकला ! -- इथं अर्थातच सगळे हसले.

अंतरा : इंटरेस्टिंग !

अनुराग : ते हास्य जरा ओसरल्यावर मी म्हणालो, योग्य केलं त्यानं ! सगळे उत्सुकतेनं बघायला लागले. म्हटलं द क्लर्क वॉज राईट इन चूजिंग दॅट कॉलम बिकॉज नाऊ द डिरेक्टर वॉज अ फिनिश्ड गुड ! -- इथं अर्थातच आणखी एक मोठा हशा पिकला !

अंतरा : का, का ? तो कसा काय फिनिश्ड गुड ?

अनुराग : विनोद हा समजावून दिला की विनोद राहात नाही ! पण ठीक आहे, चला ! तयार मालालाही फिनिश्ड म्हणतात, जो पॅक करून रवाना करायचा असतो आणि संपलेल्या गोष्टीलाही फिनिश्ड म्हणतात ! मराठीत याला श्लेष किंवा इंग्रजीत पन म्हणता येईल ! किंवा साधं आपलं द्व्यर्थी वापरलेला शब्दही म्हणता येईल ! आता इतकी फोड केल्यावर काय शिल्लक राहणार यातली गंमत ?

अंतरा : नुसतंच हसावं ! या हुशारीची गरज पडू नये ! नाहीतर मग हुशारी उपयुक्त ज्ञानातली असावी !

' असो ! ते जाऊं दे ! आता दुसऱ्या दिवसाची सकाळ ! अरे अनुराग, मला एक सांग, वॉशिंग मशीनमध्ये असं पाणी राहतं की काय ? पहाटे मी पाहिलं तर बरंच पाणी बाहेर आलं होतं ! आणि गेले चारपाच दिवस, ते चालू असताना धडधडतं मधेच ! काहीतरी बिघाड तर नसेल ?

अनुराग : बघू, आता सगळं एकदम मला जमणार नाही ! माझी नोकरी निदान टिकवायची तरी आहेच मला ! तर मी आता आलोय इलेक्ट्रिशियनच्या दुकानात आणि मिक्सर दाखवलाय ! तो म्हणतोय --

अंतरा : पूर्ण मोटर जळालीय राव ! पूर्ण अगदी रिवायंडिंग करावं लागेल !

अनुराग : खर्च किती येईल ?

अंतरा : अडीचशे रूपये. पण मग चिंताच नाही, एकदम नव्यासारखाच होईल !

अनुराग : अहो बाराशेचा मिक्सर आणि अडीचशेची दुरुस्ती ? वीस टक्के ?

अंतरा : अहो, घरात एखादी दुरुस्ती दोनतीन टक्क्यांतही होते ! □व्हरेज बघायचं !

अनुराग : कमी करा काहीतरी --

अंतरा : बरं, दोनशे चाळीस द्या --

अनुराग : ठीक आहे, लौकर द्या पण -- काम अडतंय --

अंतरा : मनातनं नाराज वाटतोस तू हल्ली !

अनुराग : छे ! कुठं काय !

अंतरा : आठ दिवसांत देतो --

अनुराग : आठ दिवस ?

अंतरा : अहो, काम चांगलं करणार, ट्रायल घेणार !

अनुराग : ठीक आहे, आठ दिवसांतच द्या पण --

अंतरा : त्याची काळजीच नका करू !

अनुराग : बाकी काय कमीजास्त असलं तर करून टाका !

अंतरा : बघतो ना ! चला, ( नोकराला -- ) हा मिक्सर घे रे आत !

अनुराग : तिथून पुढं गेलो इंलेक्ट्रिसिटी ऑफिसात --

अंतरा : ठीक आहे, तक्रार समजली -- याच्या आधीची चार बिलं घेऊन या -- मी □व्हरेज बिल करून देईन – मीटर तपासावं लागेल -- मीटर फॉल्टी असेल तर नवं मीटर तुम्ही आणून द्यायचं -- ते चेक करून आम्ही बसवू --

अनुराग : उद्या येतो याच वेळी -- आणि समजा मीटर लागलं तर कितीपर्यंत मिळतं ?

अंतरा : काय, असेल हजारबाराशे -- आणि तो पुढचा प्रश्न आहे -- या ! ( पुढच्याला --) हं, तुमचं काय ?

अनुराग तर असं झालं !

अंतरा : नशीब समज, तो, आधी हे बिल भरा, मग बघू, असं नाही म्हणाला !

अनुराग : म्हणजे पुन्हा उद्या जाणं आलं !

अंतरा : आणि ते वॉशिंग मशीनचंही बघावंच लागणार आहे -- लीकेज आणि धडधडणं !-- सध्या बंदच ठेवतीय मी -- आपल्या भांडीवालीलाच धुणंही धुवायला सांगितलंय !

अनुराग : सध्या मिटलाय ना प्रश्न ! बघू ! -- त्या वॉशिंग मशीनकडं एकदा बघू तरी ! ( त्या बाजूला

जातो.तिकडूनच -- ) अगं, पत्रा उचकटलाय त्याचा पार -- तुला दिसलं कसं नाही ? आता हे वापरूनच उपयोग नाही एवढ्यात -- आणि पुन्हा पाणी आलेलं दिसतंय खालून -- हे मशीन सध्या काढून गॅलरीत ठेवून देऊ ! --

अंतरा : तो माणूस आल्यावर बघेल ना ! --

अनुराग : नको ! ते बघू ! आजही पार बेडरूममध्ये आलं पाणी ! -- ते तेवढं तरी बघू आधी ! ( जरा खुडबुड आवाज. मग मशीन सरकवल्याचे आवाज.)

अंतरा : मदत हवीय का ?

अनुराग : नको, हलकंच आहे ते ! -- ( ते मशीन गॅलरीकडे ढकलत नेल्याचे आवाज. दोन क्षणांनी --) आता हे इथलं सगळं पुसून घेतो पाणी -- मग बघू --

अंतरा : बरं तू ये इकडे, मी घेते पुसून -- तेवढा पुरुषप्रधानपणा घेईन मी चालवून !

अनुराग : फक्त तेवढाच !

अंतरा : ते असू दे ! -- ( तीही तिकडे जाते.) अरे बापरे ! कुठलं रे हे पाणी ? ! ( दोन क्षणांनी तो बाहेर येऊन बसतो.) मला नाही वाटत हे मशीनमध्ये राहिलेलं पाणी असेलसं ! मशीनचा नळ तर मी कालच बंद केलाय ! ( दोन क्षणांनी हात पुसत बाहेर येते.)

अनुराग : मिक्सर, वीजबिल, वॉशिंग मशीन ! च्यायला !

अंतरा : आणि हे पाणी !

अनुराग: कसलं आहे ते कळू दे ना !

अंतरा : ते आहे म्हणा !

अनुराग : मला तर दुरुस्त्या म्हटलं की वैताग येतो ! आपापलं काम नीट करता येणारी माणसं नाहीच आहेत जगात ! जुने अनुभव आठवतात ! दुरुस्त्या होतच नाहीत नीट !

अंतरा : मग कसा चाललाय भारत ? प्रगतिपथावर ?

अनुराग : ते एक आश्चर्यच आहे ! पण काही माणसं असणारच कामं येणारी !

अंतरा : किंवा मग आपल्या घरातल्या वस्तूंमध्ये निर्माण होणारे फॉल्टच जरा स्पेशल -- विचित्र असतील !

अनुराग : माईंडचे फॉल्ट असू शकतील तसे, वस्तूंचे कसे असतील ? वस्तूंचं रूटीन असणार सगळं !

अंतरा : या खेपेला नीट विचारून चांगले शोध लोक ! प्रॉब्लेम्स मिटत जाणं हेच आपलं ध्येय आहे !

अनुराग : तो तर प्रयत्न करणारच आहे म्हणा मी ! पण फळांची गॅरंटी नाही ! (असे म्हणत आत जातो. तिकडूनच --) अगं, पुन्हा येतंय पाणी ! आता तर मशीनही नाहीय इथं ! नळही बंद आहे ! येतंय कुठून मग सालं ?

अंतरा : ( आत जात -- ) पुन्हा आलं पाणी ? अरे, हे भिंतीतनं तर येत नसेल ? एखादा कन्सील्ड पाईप लीकेज

असला तर ? म्हणजे मशीनचा काही संबंधच नसेल !

अनुराग : बोंबला ! तसं निघालं तर वाटच लागणार ! म्हणजे उद्याच्या उद्या प्लंबर बघावा लागणार ! हे पाणी किती वेळा पुसणार नाही तर ?

अंतरा : चांगला बघ पण !

अनुराग : नुसतं पैसे जास्त घेणारा म्हणजे चांगला असं काही नसतं याच्यात ! आणि तोंडावरनं चांगला ओळखता येत नाही !

अंतरा : तुलाच नंतर त्रास होऊ नये म्हणजे झालं ! बरं, आपण जो महिन्याभरापूर्वी आपल्या बॉयलरचा थर्मोस्टॅट बदलला त्यानंतर आपलं पाणी पहिल्यापेक्षा फारच कडक तापायला लागलं हे पाहिलंय आपण -- पण त्याचा काही प्रॉब्लेम नाही म्हणून आपण लक्ष दिलं नाही -- आज आमच्या ऑफिसात एक इलेक्ट्रिशियन आला होता, त्याला मी विचारलं तर तो म्हणाला की तो थर्मोस्टॅट मॅक्झिममवर ठेवला असणार आहे -- इतका कुणी ठेवत नाही -- त्याला येऊन मिडियमवर करून जायलाक़ सांगा --

अनुराग : आता कसला येतोय तो -- असल्या बिन पैशाच्या कामासाठी ? तरी सांगून बघतो म्हणा मी -- च्यायला त्यामुळं तर बिल वाढलं नसेल ? कशामुळं काय घडतंय हे तरी कळलं पाहिजे !

अंतरा : मला नाही वाटत ! आणि समज त्यामुळं वाढलं थोडं तरी इतकं वाढेल ?

अनुराग : बरं, उद्या मला एक आठवण कर हं -- त्यानं लेटेस्ट मीटर रीडींगही आणायला सांगितलंय -- चार लेटेस्ट बिलं आणि लेटेस्ट रीडिंग !

अंतरा : सगळं नीट चालू असलं की आपल्याला त्याचं महत्त्व कळत नाही !

अनुराग : तरी आपण हा जुना बॉयलर इकडे आणाला आणि नवा अण्णाआईंना घेऊन दिला ते बरं झालं ! ते कुठं बसले असते दुरुस्त्या करत !

अंतरा : ते तर आहेच ! फक्त, चांगलं वागलेलंही लक्षात राहावं एवढं मात्र वाटतंच !

अनुराग : ते जाऊं दे ! स्वभाव बदलण्याचे विषय नकोत ! होणं शक्य असलेल्या दुरुस्त्यांचं तेवढं बघू !

अंतरा : त्यांनी तिथंच राह्यचा निर्णय घेतला -- इथं आपण हा फ्लॅट घेतला -- उगीचच आर्थिक ताण वाढतात की नाही ?

अनुराग : पण शक्य होतंय ना आपल्याला ? आणि भाव वाढतायत जागांचे ! जबरदस्त फायदा होईल !

अंतरा : ते आहे म्हणा ! पण घर विकलं तर ! नाहीतर नुसतं मानसिक समाधान ! व्यवहारावर आधारित समाधान महत्त्वाचं !

अनुराग : करेक्ट ! हे तर आणखीनच बरोबर !

अंतरा : आता भाव वाढतायत म्हणून ! मधे काही काळ स्टॅटिक होते !

अनुराग : पण आता मिटलाय ना तो प्रश्न ? !

अंतरा : ताबडतोब काही त्रास झाला तरच तो महत्त्वाचा प्रश्न !

अनुराग : ताबडतोब काही त्रास दोघांनाही झाला तर ! नाही तरी सगळया गोष्टी सदोदित परफेक्ट कशा असणार ? खूप गोष्टी चालवून घेणं हे तर करावंच लागतं ! सगळयांनाच ! असं समजावतच असतो मी मला !

अंतरा : तरीही, त्यातल्या त्यात चांगलं जगणं, बरं जगणं, वाईट जगणं -- असं काही असतंच !

अनुराग : नशीब म्हणायचं त्याला आणि जाऊ द्यायचं बोंबलत ! बरं नसेल जगणं तर !

अंतरा : नशीब म्हणून बुध्दिप्रामाण्यवादाचं महत्त्व नाकारू नकोस ! तसं केलंस तर स्त्रीपुरुष समानतेचंही विसरशील !

अनुराग : मला मुख्य म्हणजे ते मीटररीडींगचं लक्षात ठेवायचंय ! ( जणूं स्वत:शीच -- ) मी विनोदही करतो – तडजोडी, दुरुस्त्या होतही राहतात -- तरीही काहीतरी महत्त्वाचं राहतंय -- असा एक धागा चालूच राहतो -- भाषेचा सूक्ष्मपणा लागणारच असंच दिसतंय -- कधीतरी उघडं पडणारच हे !

अंतरा : भाषेचा सूक्ष्मपणा हा काही आपल्या खास इंटरेस्टचा विषय नाही. असो. नाहीतर नसो. आता दुसऱ्या दिवसाची सकाळ. तू जाऊन पहिल्यांदा प्लंबर आणतोस कारण आधीच्या रात्रीही उठून तीनचारदा आपल्याला पाणी भरून टाकावं लागलेलं आहे. तर प्लंबर.

अनुराग : तर हे असं पाणी येतंय कुठनं तरी !

अंतरा : ( जरा बघून --) भिंतीतनं येतंय कुठनंतरी ! ( बघत -- विचार करत -- चाचपत --)बॉयलर चालू होता काय ?

अनुराग : होय --

अंतरा : हितं गरम लागतंय पानी -- आता मी काय जास्त पैशे सांगनारा न्हाई -- ह्येच दुसऱ्याला दाखवून बगा -- धा हजारापासनं सुरू व्हतील !

अनुराग : ते जाऊं द्या -- तुमचं बोला --

अंतरा : हितं वॉशिंग मशीन होतं काय ?

अनुराग : होय -- ते बिघडलंय म्हणून बाजूला काढलंय --

अंतरा : बरं झालं -- आता बगता तं यील नीट -- बॉयलरचा पाईप हितनं भित्तीतनं जातोय --

अनुराग : बरोबर --

अंतरा : कन्शील्ड पाईपचं काम लई वाईट ! कळलं नाही तर कुटूनबी सुरुवात करंल एकांदा -- पोलीसासारकंच असतंय ह्ये -- बरूबर सापडावं लागतंय -- कुनीबी म्हनल, पानी हितनं बाहेर येतंय हो -- पर झिरपतंय कुटनं ? -- भाएर जिन्यात बघितलं का? हितनं झिरपलेलं पानी स्लॅबमदी मुरून जिन्याची भित वल्ली झालीय तुमची ! तिकडं काय फॉल्ट हाय ? फॉल्ट हिकडं हाय ! फॉल्ट हिकडं हाय ! आन हिकडंच --

याच भित्तीत -- का, तं पानी -- ह्ये झिरपनारं -- हाताला जरा गरम लागतंय -- बॉयलर तापलेला असताना बघिटलं त्ये बरं झालं -- तरी बी दुसऱ्याला कळालं नसतं -- ह्ये असलं कन्शील्ड पाईपचं काम लई वाईट ! सस्पेन्स एकदम ! फोडाया कुटनं सुरुवात करावी ह्येच कळत न्हाई !

अनुराग : ठीक आहे -- खर्चाचं बोला --

अंतरा : हिकडच्या टाईल्स फोडाव्या लागनार -- पार आत पाईपापोतर जावं लागंल -- आन समदं जाल्यावर परत टाईल्स बसवून देऊ.

अनुराग : काम परफेक्ट व्हायला पाहिजे -- असं पाणी एक थेंबही आलं नाही पाहिजे --

अंतरा : लीकेज पूर्नच काडावं लागंल -- हाफ लीकेज कोन काडत नसतं --

अनुराग : हं, तर किती ?

अंतरा : एकच सांगतो -- दोन हजार आमचे -- लागनारं सामान समदं तुमी आनायचं --

अनुराग : फार होतात --

अंतरा : मी आन एक बिगारी दिवसभर आन् टाईलवाला येगळा -- मेहनत लई हाय -- घाम काडंल --

अनुराग : बरं, कामाचे अठराशे प्लस सामान, चला ! पण तरी सामान किती लागेल ?

अंतरा : ते बगू की -- पन हजाराच्या वर काय जात नाय --

अनुराग : तरी काय काय लागेल ?

अंतरा : सिमेंट, वाळू , व्हाईट सिमेंट, टाईल्स आणि आतलं पाईप फिटिंगचं सामान --

अनुराग : आणि सुरू कधी करणार ?

अंतरा : लगीच -- ( जणू अनुरागशी -- ) तू नाराज असणं हा अर्जंटच आहे ना प्रॉब्लेम !

अनुराग : त्यासाठी दुरुस्ती तुझ्यात व्हावी लागणार आहे ! ( पुन्हा प्लंबरला -- ) तुम्ही असं करा, तुमचा मोबाईल नंबर द्या -- मला छोटंसं एक अर्जंट काम आहे -- तेवढं करून आलो की मी फोन करतो --

अंतरा : मला बी मानूस, हत्त्यारं आनायला जरा येळ लागंलच -- पर जास्त येळ घालवू नका -- नायतर परत उद्या यावं लागंल --

अनुराग : ते काहीही असो -- एवढ्यातच करायचं -- मी आज रजाच घेणार आहे -- पुन्हा उद्या घ्यायला लावू नका -- आज रात्री कितीही वाजले तरी चालेल ! -- या मग !

अंतरा : व्हय ! फोन करा मग, लौकर !

अनुराग : होय, करतो करतो !

अंतरा : ( मूळ भूमिकेत -- ) तर ठरलं बाबा ! खरोखर चिवट रे बाबा तू ! कामाची सवय पाहिजे पण ! मला जरा बौध्दिक कामांची आहे इतकंच !

अनुराग : आणि मला कसली आहे ? हमालीची ?

अंतरा : तसं नाही रे --

अनुराग : ही कामं लौकरात लौकर न होणं याचा अर्थ समजतो का तुला ? बुध्दीनं ? सदोदित शारीरिक श्रम जास्तीचे करावे लागणं ! आणि न जाणो या सततच्या पाण्यामुळं आजारपण येणं ! शारीरिक ! पाण्यासारखा निष्पाप आतंकवादी कुठं नसेल ! एखाद्या तत्त्वनिष्ठ माणसासारखं ! ठरलं ते ठरलं ! ते तसं वागतच राहणार !

अंतरा : तत्त्वनिष्ठा तर लागणारच रे ! पण, या एकूण प्रकारात आपल्या आपल्यातही असं स्मूथ वाटत नाही रे !

अनुराग असणारच कुठंतरी बिघाड ! पण, ते सगळी लिमिट संपून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा त्रास व्हायला लागल्याशिवाय कळणार नाही -- हे सुध्दा आतल्या आत, किती दिवस चालू असेल कोण जाणे ! आणि आपल्याकडे बिघडलेल्या गोष्टी दुरुस्त करायची पध्दत आहे -- सारख्या नव्या गोष्टी आणायची नाही -- आणि आपण ठरवलं तर खूपशा गोष्टी दुरुस्त होतही राहतात !

अंतरा नाही तरी बायको किंवा नवरा नवीन आणणं तसं सोपं नसतंच ! -- ते जाऊं दे ! कामाचं बघू ! एकमेकांतली समजूत हाच कामाचा पाया रे !

अनुराग : कुठल्याही कामाच्या बाबतीत इनिशिएटिव्ह मीच घ्यायचं ही पध्दतच पडलीय आपल्या घरात --

अंतरा : निकड आणि सोय बघायची रे ! बरं, तेही जाऊं दे -- काय काय झालं मग काम ?

अनुराग : त्याचे अंदाज बरोबर निघाले ! लीकेज सापडलं ! एक जुना पाईपचा तुकडा फुटला होता ! आपण ते बेसिन आणि त्या भिंतीचं काम करून घेतलं होतं ना तेव्हा चुकून हा तुकडा बदलायचा राहिला होता बहुतेक ! तेवढ्या दुर्लक्षाचा हा त्रास झाला ! ते काढलं, नवीन सामान आणलं -- फिट केलं -- आता राहू दे म्हणाला ओपनच सकाळपर्यंत -- आता पाणी येत नाही ही तुमचीही खात्री होऊ द्या म्हणाला --

अंतरा : आणि मशीनच्या वरच्या जागेत आपण जे लाकडी कपाट केलं होतं ते काढलंय वाटतं --

अनुराग : काढावंच लागलं ! दारं, कप्प्यांच्या फळया काढून ठेवल्यायत -- त्या पुन्हा उपयोगी पडतील -- ते काढल्याशिवाय तिथं कामच करणं शक्य नव्हतं त्यांना -- त्या कपाटातलं सगळं सामान काढून बेडरूममध्ये ठेवलंय मग --

अंतरा : फारच मेहनत पडली रे बाबा तुला ! --

अनुराग : त्याच्याहून पुढचं संकट म्हणजे, हे सगळं झालं की सुतार बघावा लागणार आहे आता ! त्यातल्या त्यात एक बरं झालं की हा प्लंबर चांगला मिळाला ! त्या त्या वेळी कामं होतायत हे एक आश्चर्यच वाटतं मला !

अंतरा : सुतार मी आणते -- पलीकडच्या गल्लीत पाटोळयांकडे काम चालू आहे -- मिसेस पाटोळयांना पाठवायला सांगते -- कधी पाठवायला सांगू ते सांग -- आपलं हे काही एवढं मोठंसं काही काम नाही --

अनुराग : ते सांगतो मी -- पण सदोदित मलाच रजा घेत राहता येईल असं नाही --आता आणखी एक दिवस रजा

वाढणारच आहे माझी --

अंतरा : ठीक आहे -- ते माझ्याकडे लागलं -- अविनाशला एक दिवस इकडे बसायला सांगते -- सध्या घरीच अभ्यास असतो त्याचा --

अनुराग : म्हणजे मग तुझी काकू हे उपकार सगळयांना सांगत फिरणार !

अंतरा : माझ्यावर उपकार -- तुझ्यावर नव्हे ! ते मी बघून घेईन ! माझाही चुलत भाऊ आहे तो ! तेवढा त्रास दिला तर काही बिघडत नाही --

अनुराग : जिथं आणि जेव्हा जेव्हा आपणच हजर असणं आवश्यक आहे तेव्हा तेव्हा मी रजा घ्यायची !

अंतरा : तूही थोडी मॅनेजमेंट टेक्निक्स वापरत जा रे !

अनुराग : कधी संपणार सगळं कोण जाणे ! मला तर च्यायला स्वप्नंच पडायला लागलीयत की पडझड चाललीय सगळीकडे आणि आपण कसेबसे बचावतोय ! तू आणि मी !

अंतरा : डोण्ट बी सेंन्टिमेन्टल न्ड सिली !

अनुराग : मी सगळी कामं करत असल्यामुळं तू सुपीरिअर असल्याच्या भ्रमात राहतेस !

अंतरा : घरातला कर्ता माणूस आहेस बाबा तू !

अनुराग : या सगळया गडबडीत लहान मूल नाही घरात हे एक बरं आहे ! कुठं एखादा खडा, खिळा घातला असता तोंडात म्हणजे वाट लागली असती !

अंतरा : बी बिथ व्हॉट इज ! आपण असं जगत नाही म्हणून प्रॉब्लेम्स होतात ! अनावश्यक विषय नकोत ! आणि ' मूल ' हा विषय तर ...

( प्रकाश हळूहळू मंद होत जातो ... पडदा पडत जातो ... )

**--- अंक पहिला समाप्त --**

**-- अंक दुसरा --**

( आधीचे दोन संवाद पुन्हा घेऊन पुढे चालू -- )

अनुराग : या सगळया गडबडीत लहान मूल नाही घरात हे एक बरं आहे ! कुठं एखादा खडा, खिळा घातला असता तोंडात म्हणजे वाट लागली असती !

अंतरा : बी बिथ व्हॉट इज ! आपण असं जगत नाही म्हणून प्रॉब्लेम्स होतात ! अनावश्यक विषय नकोत ! आणि ' मूल ' हा विषय तर ...

अनुराग : पूर्वी आपण घेतलेला एखादा निर्णय आज चुकीचा वाटला तर ?

अंतरा : तरी, बी विथ व्हॉट इज ! ' त्यापेक्षा असं करायला हवं होतं ' किंवा ' अजूनही असं होऊ शकलं तर ' – याला माईंड करणीभूत असतं ! फरगेट इट !

अनुराग : आणि करीअरिस्ट होण्याला काय कारणीभूत असतं ?

अंतरा : तरीही, आपल्याला एखादी गोष्ट प्रॉब्लेम वाटायला लागली तर या अर्थपूर्ण तत्त्वाची आठवण जागवावी ! नक्की फायदा होतो ! माझा अनुभव आहे ! बी विथ व्हॉट इज !

अनुराग : आता गेलो घरी की अण्णा आणि आई यांनाही सांगतो हे तत्त्व ! त्यांनाही उपयोगी पडेल !

अंतरा : जे. कृष्णमूर्तींचं आहे बाबा ते !अखिल मानवजातीसाठी आहे ते ! नम्र राहण्याची तयारी असलेल्या कुणालाही उपयोगी आहे ते ! नम्र म्हणजे अपेक्षाभंगात पिचत न राहणं !

अनुराग : मी काही कृष्णमूर्ती फारसं वाचत नाही हे मान्य ! पण हा त्यांचा दुरुपयोग तर चालू नसेल -- असा मात्र मला डाऊट येतो ! याच्यावर परत तुझंच म्हणणं मला उपयोगी पडणार नाही !

अंतरा : डोंट मूव्ह अवे फ्रॉम द प्रॉब्लेम ! तुझा प्रॉब्लेम काय आहे ते ओळख आणि बघ सरळ ! त्याच्यापासून पळू नकोस ! बघ ! फेस इट !

अनुराग : तुझ्या सांगण्यावरनं मी काही करणार नाही आणि कृष्णमूर्तीही फारसं वाचणार नाही !

अंतरा : नुसतं कन्फ्यूज्ड राहू नकोस एवढंच माझं म्हणणं !

अनुराग : कन्फ्यूज्ड म्हणजे वाईट हे तरी कशावरून ?

अंतरा : त्याचा स्वत:ला आणि इतरांना त्रास होतो यावरून ! आता त्रास होणं वाईट कशावरून -- असं कृपया विचारू नकोस ! इतका काही तू डल नाहीस !

अनुराग : तुझं सर्टिफिकेट असल्यावर चिंताच नाही ! तुला कसलाच त्रास नाही हे गृहीत धरू म्हणजे झालं !

अंतरा : बरं, ते जाऊं दे, कुअली तो लीकेजवाला पाईप सापडल्यावर काय वाटलं ?

अनुराग : कारंजाच उडत होता त्यातून -- तीन भोकांतून -- आणि पूर्ण गंजला होता तो पाईप ! ते कारंजे बघितले आणि मनानं उडीच मारली ! कारण, खरी उडी मारली तर तो प्लंबर पैसे वाढवून मागेल असा धोका वाटला ! पण आयुष्यातला मुख्य प्रश्न सुटला -- आता आयुष्य मार्गी लागेल असं वाटलं !

अंतरा : आख्खं आयुष्य ?

अनुराग : त्यावेळी तो प्रश्न असतोच ना तसा महत्त्वाचा ! नंतर कळतं की हा काही मुख्य प्रश्न नव्हताच ! --

अंतरा : ठीक आहे, हा आता मी सुतार आणलेला आहे -- तर हे बघा -- इथलं हे कपाट काढावं लागलं होतं -- त्याची दारं, कप्पे सगळं आहे -- फक्त पुन्हा होतं तसं करायचंय -- आणि पाटोळयांनी तुम्हाला इकडं पाठवलंय हे लक्षात ठेवा -- आणि हे नीट केलं तर पुढं काहीही छोटंमोठं काम निघालं तर तुम्हालाच सांगू --

अनुराग : पयलं म्हंजी मी छोटीमोटी कामं करीतच न्हाई -- फक्त नवी आणि मोटीच कामं घेतो -- इचारा की

पोटोळयास्नी -- त्यांनी लावून दिलं म्हून आलोय --

अंतरा : काय काय करता नवीन ?

अनुराग : सगळं -- ऑफीस फर्निचर, वार्डरोब, सोफा, दिवाण, सगळया प्रकाराची कपाटं, टेबलं, सगळं --

अंतरा : बरं, ठीक आहे, याचं बोला --

अनुराग : याचं काय घ्यायचं ओ -- माजा असिस्टंट पाटवतो -- द्या त्याला दोनशे आन सामान द्या लागंल ते – खिळे, बिजागऱ्या, पट्ट्या --

अंतरा : सामान कितीचं होईल ?

अनुराग : आता तुमच्याकडं असल्यालं बगिटलं त्येच्यापरमानं व्हईल दोनशेचं !

अंतरा : म्हणजे शंभर टक्के मजुरी ?

अनुराग : येळ किती जानार, ते बगायचं, प्लस त्याला माजा गायडन्स ऱ्हानार, प्लस माजी जिम्मेवारी --

अंतरा : बरं, करून टाका -- उद्या सकाळी या -- माझा भाऊ थांबेल इथं -- करून टाका -- काम झालं की तो पैसे देईल --

अनुराग : सामानाचा दोनशे □डवान्स द्या --

अंतरा : अहो, पाटोळे ओळखतात आम्हाला -- करून टाका --

अनुराग : बरं, समदं बगून जातो -- उद्या सक्काळी अकराला माजा मानूस यील सामान घ्यून --

अंतरा : चालेल --

अनुराग : ( अंतराला -- ) ए, थांब, थांब ! परवा सांग त्याला -- उद्या टाईल्स बसवणं वगैरे आहे -- परवा !

अंतरा : बरं, परवा या --

अनुराग : जी --

अंतरा : ठीक आहे -- उद्या हे होईल, परवा ते होईल -- तू त्या इलेक्ट्रिशियनला सांगितलंयस का ते बॉयलरचं ?

अनुराग : दोनदा सांगितलंय -- तो येतो म्हणालाय --

अंतरा : म्हणजे तेही होऊन जाईल -- मस्त !

अनुराग : म्हणजे मग संपतीलच प्रॉब्लेम्स ! पण हे सगळं एकाएकी कसं काय निघत चाललंय ?

अंतरा : मिक्सर किती वर्षं काम देणार ? बॉयलरही ? आणि वॉशिंग मशीन ? त्याचं काय ? ते व्हायचंय ना अजून --

अनुराग : हे सगळं झाल्यावर तो माणूस रविवारीच बोलवू ! नाहीतर मधे कधी संध्याकाळी सातनंतर यायला तयार असला

तर !

अंतरा : असं जर निरनिराळया गोष्टी बिघडत, मोडत राहिल्या तर त्या दुरुस्त करणे, नव्या आणणे याच विषयावर बोलण्यात आपलं आयुष्य संपून जाईल ! देअर विल बी नो अदर प्रॉब्लेम !

अनुराग : आख्खं आयुष्य ! कशाला ! जगता जगताच सहज व्हायला पाहिजे हे सगळं ! आणि जेवढं जसं जगणं होईल ते ओके ना ! बी विथ व्हॉट इज ! मग प्रॉब्लेम काय आहे ? समजलं -- दुरुस्त झालं ! असं !

अंतरा : जे समजून घ्यायची कुवत नाही त्याची चेष्टा करा आणि हसा ! या सद्गुणापासून कधी मुक्त होणार आपण कोण जाणे !

अनुराग : आपण नव्हे -- मी ! पण, समजून घेणाऱ्यांचं तरी काय महान चाललंय लाईफ -- दिसतंय ! आणि समजून तरी घेतायत का ते ?

अंतरा : शट अप ! मी दमून आलेय आणि मला स्वैपाकाचं बघायचंय ! ( चिडून आत जाते. काही क्षणांनी बाहेर येते.)

अनुराग : तर सुतार ! माय गॉड ! महा संकटातून बचावलो !

अंतरा : म्हणजे ? झालं ना काम ?

अनुराग : तो आला, अविनाश इथं थांबला, पण बापरे ! दुपारी अविनाशचा ऑफिसात फोन आला मला ! उडालोच !

अंतरा : ए, सांग नीट -- काय झालं ?

अनुराग : आता, सरळच आहे की ते लाकडी कपाट मूळ जागी तयार करून लावायचं होतं. त्यासाठी काही भोकं पाडणं, स्क्रू पिळणं गरजेचंच होतं. त्यासाठी ड्रिलिंग मशीन अत्यावश्यकच होतं. त्या सुताराकडं होतंच ते --आणि त्याचंच काम चालू होतं. तर एका ठिकाणी भोकच पडेना -- तेव्हा त्या सुतारानं अविनाशला विचारलं की म्हणे इथं आत काही पाईपबिईप तर नसेल ? नशीब की अविनाशनं मला फोन केला ! म्हटलं, पहिलं काम, ताबडतोब ते ड्रिलिंग थांबव, मग पुढचं सांगतो ! त्यानं तसं केलं ! म्हटलं बाबा, तू हा प्रश्न विचारल्यावर मला इथून उडी मारून मारुतीसारखं उडत एका सेकंदात तिथं पोचायची इच्छा झाली ! म्हटलं बाबा, पाईपच आहे !! त्यासाठीच झालाय सगळा उपद्व्याप ! परत मोठ्या कौशल्यानं त्या पाईपला भोक पाडणं नकोय ! जरा वेगळया रंगाच्या टाईल्स दिसतायत ना त्या आत्ताच बसवलेल्या आहेत -- त्यांच्याच आत तो महान पाईप आहे ! तर एक त्या सुताराला कटाक्षानं पाळायला सांग, म्हणावं, त्या वेगळया कलरच्या टाईल्सची जी लाईन आहे त्यावर कुठंही भोक न पाडता काय ते काम कर ! आणि म्हटलं, इन द मीन टाईम, तो पाईप फुटलाच असेल पुन्हा तर कळव, मी लगेच या सातव्या मजल्यावरनं खाली उडी मारतो ! घाम फुटलावता मला ! पण तो म्हणाला, तसं काही नाहीय, डोंट वरी, आणि आता लीव्ह इट टु मी !

अंतरा : अच्छा ! काम तर बरं दिसतंय झालेलं !

अनुराग : म्हणून माझं जे म्हणणं असतं ना की आपली स्वत:चीच हजेरी आवश्यक असते अशा वेळी -- ते यासाठी !

अंतरा : किंवा मग अत्यावश्यक सूचना आधीच देता आल्या पाहिजेत ! मग प्रश्न येत नाही ! येऊ नये !

अनुराग : मला झोप आली ! मी पडतो जरा ! स्वैपाक झाला की सांग -- ( आत जातो. ती दुसरीकडे म्हणजे स्वैपाकघराकडे जाते. काही क्षणांनी तो डोळे चोळत बाहेर येतो. ती एकीकडून येते.)

अंतरा : कालचा दिवस संपवला आपण कसाबसा, आज आता पुढची आनंदाची बातमी आहे ! बॉयलर चालू होता -- मधेच आवाज झाला आणि तो बंद पडला -- आवाज फ्रीजजवळ झाला ! फ्रीजही बंद पडला आहे ! आणि हॉल सोडून सगळीकडची वीज गेलेली आहे !

अनुराग : ( शांतपणे -- ) आता, मी जरा दातबीत घासून येतो, चहा कर, चहा पितो, जरा पेपर वाचतो आणि मग हे सगळं मला पुन्हा सांग !

अंतरा : मला वेळ हवा ना पण तेवढा ! ( अनुराग आत जातो. अंतरा स्वैपाकघरात जाते. काही क्षणांनी अनुराग परत येतो. दाराकडे जाऊन पेपर घेऊन येतो. बसतो. वाचू लागतो.)

अनुराग : ( आत असलेल्या अंतराला -- ) तुला सांगतो, आमच्या ऑफिसातही रिनोव्हेशन सुरू झालंय – आमच्या साहेबांच्या केबिन्सच्या जागा बदलतायत -- आमच्याही जागा बदलतील -- कपाटं, फायली, कॉम्प्युटर्स -- सगळी हलवाहलवी चालू झालीय ... आता फक्त धूळ, आवाज, सतत डिस्टर्बन्स आणि वस्तू, कागद वेळेवर न सापडणे वगैरे सूरू राहील...( काही क्षणांनी --) बातम्याही सगळया तशाच दिसतायत ... रेल्वे लाईन्सच्या दुरुस्त्या, पाण्याच्या पाईपलाईन्स, वीज यंत्रणा, रस्ते -- सगळीकडे दुरुस्त्या चालल्यायत, थिएटर्स पाडून मॉल्स बांधतायत, बंगले पाडून प्रचंड टॉवर्सच्या इमारती उभ्या करतायत, अविश्वासाचे ठराव आणून सरकारंही पाडायचे प्रयत्न चालू आहेत -- सगळया उपयोगी आणि आवश्यक गोष्टींतून मन खरचटत जात राहणं म्हणजेच आयुष्य असं झालंय -- सुखाचा म्हणावा असा एखादा क्षणही पूर्ण सुखाचा वाटत नाहीय -- मुख्य म्हणजे इथं कोपऱ्यात एक अगदी छोटीशी बातमी आहे की माणसामाणसांमधले सगळेच संबंध बिघडत चालल्याचं लक्षात आल्यामुळं सगळीच माणसं स्वत:मध्ये दुरुस्त्या करायला तयार होतायत ! हे एका स्वीडिश शास्त्रज्ञाचं संशोधन आहे म्हणे ! आणि कहर म्हणजे माणसांमधल्या अशा दुरुस्त्या औषधांनी करता येतील असं त्याचं म्हणणं आहे ! म्हणजे, स्वभावावर औषध आहे ! ( विचारात बसून राहतो. काही क्षणांनी अंतरा येते. आता ती इलेक्ट्रिशियन आहे.)

अंतरा : मी चेक केलंय. आख्खी लाईनच जळलीय ! सगळं वायरिंग बदलावं लागेल. बॉयलरची, फ्रिजची तुमची वायर योग्य वापरलीच नव्हती. ती आम्ही योग्य वापरू. आणि आता वायरिंग नवंच करायचं आहे तर पूर्ण केसिंगकेबिनच घ्या करून. म्हणजे कटकटच नाही.

अनुराग : खर्च ?

अंतरा : ते बघून सांगतो. काम जरा जास्त आहे. आमचे मालक येतील खर्च सांगायला.

अनुराग : दुसरा काय मार्ग ? फार खर्चात न पडता ?

अंतरा : साधं फिटिंग करा -- वायर्स योग्य आणि चांगल्या वापरायचा आग्रह सोडून द्या -- बटणंबिटणं साधी वापरा --बराच खर्च वाचेल -- धोका पत्करा ... थोड्या दिवसांनी पुन्हा खर्च करा ...

अनुराग : बरं बघू -- घेऊन तर या तुमच्या मालकांना --

अंतरा : कधी येऊ ?

अनुराग : या लगेच ! ( स्वत:शी -- ) आजही खातो बोलणी !

अंतरा : आज तू नको बोलणी खाऊस -- मी करते फोन आणि मी जाते जरा उशिरा -- आज --

अनुराग : अगं पण, तो खर्च भरमसाट सांगायला लागला तर तू घेणारायस का डिसिजन ?

अंतरा : तो काम काय आहे म्हणतोय ते बघणार -- त्यातले जे मेजर आयटेम असतील त्यांचा दुसरीकडे काय खर्च सांगतात हे त्याच्या समोरच एकदोन फोन करून मी बघून घेणार -- आणि साधारण बरोबर असेल याचं तर घ्यून टाकणार निर्णय आणि देणार काम त्याला ! आणि जे अर्जंट आणि अटळ खर्च असतात तिथे शरणागती पत्करणं बेस्ट ! उगीच डोकं पिकवून घेत बसायचं नाही ! आणि अटळ खर्चही पुढं ढकलावे अशी, इतकी काही आपली आर्थिक परिस्थिती कमकुवत नाही ! काही फायदेही असतातच ना एखाद्या जुन्या निर्णयाचे ! माझ्यासारखी बायको मिळण्याचे !

अनुराग : थँक यू ! या तरी कामाची जबाबदारी घेतल्याबद्दल आणि मुख्य म्हणजे माझं बोलणी खाणं वाचवल्याबद्दल ! पाहिजे तर डबल थँक्यू !

अंतरा : जबाबदारी ? माझा पगार तुझ्या दीडपट आहे ! का बाबा ? मी माझ्या क्षेत्रात परीक्षा दिल्या, प्रगती केली -- तू तुझ्या क्षेत्रात तसं केलं नाहीस ! हे झालं जबाबदारीचं !आणि दुसरं म्हणजे तुझे अपमान होणं, तुझा मूड खराब होणं हे मलाही त्रासदायकच नाही का ? तुझीही काळजी घेणारच की मी !

अनुराग : अरे वा ! मग तर आणखीनच थँक यू ! म्हणजे हे काही माझ्या आपुलकीमुळं, सहानुभूतीमुळं वगैरे नाहीच आहे ! तुझ्या स्वत:साठीच आहे ! आणि विशेष आभार यासाठी की, आपल्या पगारातली तफावत -- मी लक्षात ठेवणं महत्त्वाचं आहे याची जाणीव दिल्याबद्दल ! आणि जुन्या निर्णयाच्या फायद्याचीही !आणि मुख्य म्हणजे मी नाराज असण्याची कारणं दुरुस्त करण्यात इंटरेस्ट आहे तुला ! वा !

अंतरा : खरं तर इतका सहवास असल्यावर जाणीव देणंबिणं असल्या प्राथमिक गोष्टींची गरजच पडू नये – जस्ट लव्ह ! ( तो रागाने आत जातो. काही क्षणांनी बाहेर येतो.) तर, तो त्याच्या मालकासह येऊन गेला. त्यांचा मुख्य हिशोब विजेचे एकूण पॉईंट्स् किती याच्यावर असतो. मी चौकशी केली, तो बरोबर

सांगत होता. शिवाय मी त्याला इन्व्हर्टरच्या दृष्टीनं सोय करायला सांगितली. एकूण खर्च सुमारे साडेसात हजार होणार आहे. म्हटलं बॉयलरचं काय ? आणि फ्रिझ का बंद पडलाय ? तर तो म्हणाला की हे सगळं फिटिंग झाल्यावर मगच ते सगळं चेक करून काय ते सांगता येईल --

अनुराग : च्यायला, या महिन्यात रिपेअर्स अँड मेंटेनन्स हा कॉलम भरपूर एन्ट्रीज घेणार असं दिसतंय !

अंतरा : एक तर आपलं काही सामान, बरीच वर्षं, विनातक्रार -- विनाखर्च सेवा देत आलेलं आहे -- आणि एकूणातच आपण गेल्या काही वर्षांत या कॉलमचा फारसा खर्च केलेला नाही. आता एकदमच या गोष्टी एकामागोमाग एक यात्व्यात याला योगायोग म्हणता येईल. नीट चाललेल्या गोष्टींची फारशी देखभाल करायची पध्दत आपल्याकडे नाही. बिघाड झाला तरच द्यायचं लक्ष !

अनुराग : ते आहे म्हणा ! आणि तुझ्यासारखी दीड शहाणी म्हणजे माझ्या दीडपट पगाराची बायको असल्यावर मला काय चिंता ? कुठल्याही बिघाडाची ?

अंतरा : तेच पुन्हा ! अनुराग, तू ना, मानापमान या विषयात फार वेळ आणि एनर्जी वाया नको घालवत जाऊस ! आपल्याला दोघांनाही खूप बरं पडेल ते !

अनुराग : मला काय बरं पडेल हेही तूच सांग ! बरं, आता या फिटिंगच्या कामाच्या वेळीही बोलवलं आहेस का अविनाशला ?

अंतरा : नाही -- ते कामच रविवारी करायला सांगितलंय त्याला, म्हणजे आपण दोघंही असू !

अनुराग : आपण दोघंही म्हणजे मुख्यत: मी ! व्हेरी गुड ! संपला आजचा दिवस ! चला, जेवण करून घेऊ ! ( दोघेही आत जातात. काही क्षणांनी बाहेर येतात.) रविवारी आपण दोघंही असू असं म्हणालीस, पण काय झालं ?

अंतरा : अरे माझ्या जवळच्या मैत्रिणीच्या घरचं फंक्शन होतं -- जायला नको ? तिच्या मुलाचा पहिला वाढदिवस होता -- खूप मोठ्या प्रमाणात साजरा केला तिनं !

अनुराग : ओके ! काम झालं ते -- फ्रिझ चालू झालाय. पण बॉयलरची कॉईल जळालीय म्हणाला तो -- शिवाय तो बॉयलर बराच गंजलाय -- याच्यावर जास्त खर्च नका करत बसू असं म्हणाला --

अंतरा : तरी कधी घेतला होता रे तुम्ही तो ?

अनुराग : नक्की नाही सांगता येणार पण पंधरापेक्षा जास्त वर्षं झाली असतील --

अंतरा : तसं चांगलं काम दिलं त्यानं -- बदलावाच लागेल म्हणजे आता -- अटळच आहे !

अनुराग : हो --

अंतरा : आणून टाकू -- आणि चांगल्या रिनाऊन्ड कंपनीचाच घेऊ -- कटकट नको --

अनुराग : आपण हे करू म्हणायचं आणि स्वत: निघून जायचं असं या बाबतीत करावं लागणार नाही

असं बघू -- आपल्याला दोघांनाही वेळ असेल तेव्हाच जाऊ आणायला --

अंतरा : म्हणजे तोपर्यंत गॅसवर पाणी तापवणं आलं !

अनुराग : नको ! मी बघतो ते ! ( काही क्षणांनी --) तुझ्या त्या मैत्रिणीचा हा पाहिलाच मुलगा वाटतं --

अंतरा हो -- म्हणून तर एवढा आनंद ना -- ती जस्ट क्लार्क आहे -- इट इज एव्हरीबडीज चॉईस !

अनुराग : करीअरिस्ट व्हायचं का आणि कितपत व्हायचं ! आणि घेतलेला निर्णय बदलावा की बदलूच नये ?

अंतरा : ( बेफिकिरीने -- ) हं --

अनुराग : चॅटिंगमधनं आपली ओळख झाली -- वाढली -- मग आपण भेटायला लागलो -- तुला करीअर करायची असल्यामुळं, मूल होऊ द्यायचं नाही, ही तुझी अट होती -- ती मी अगदी सहज मान्य केली -- आवडलीच होतीस तू मला ! तुझी ही अट माझ्या आईवडिलांना मी सांगायलाच नको होती -- कळेल तेव्हा कळलं असतं -- पण झालीच ती चूक ! लग्नानंतर काही दिवसांनी सांगितलं गेलंच ते ! त्यांना तो धक्काच होता ! त्यांनी माझा तर राग धरलाच पण ही अट तुझी असल्यामुळं आणि या बाबतीतल्या तुझ्या हट्टीपणामुळं तुझा तर फारच जास्त राग धरला ! आणि तुझ्या घरच्यांचा तर आधीपासून विरोधच होता -- मी तुझ्यापेक्षा कमी शिकलेला म्हणून ! -- त्यांचं बरोबर तर नसेल ?

अंतरा : ठीक आहे -- पार केलंय आपण ते सगळं ! --

अनुराग : ( जणू स्वत:शीच --) आता मला वाटतंय, चूकच झाली माझी ती ! निर्णय चुकलाच तो माझा ! मूल हवंच !

अंतरा : ए ! वेडाबिडा आहेस की काय ! दोघांनी मिळून घेतलेला -- स्वीकारलेला निर्णय होता तो !

अनुराग : मला आता तो चुकीचा वाटतोय ! त्याच, तेव्हाच्याच मनस्थितीत नाहीय मी आत्ता !

अंतरा : बरं, मग ?

अनुराग : मला वाटतं, बदलता येईल हा निर्णय ! झालेली चूक दुरुस्त करू !

अंतरा : एकदम इतक्या सगळया दुरुस्त्या निघाल्यामुळं अस्वस्थ झालायस तू ! डोंट वरी ! संपत आलंय ते ! बॉयलर नवा आणला आणि वॉशिंग मशीन दुरुस्त झालं की झालं ! मग काय आहे ? !

अनुराग : मी मात्र सगळी काळजी घेतो ! आपला जुना बॉयलर कितीला जाईल तेही पाहून घेतलं मी ! त्या जुन्या बॉयलरमध्ये, आत तांबं असल्यामुळं भंगारवाले सहज तो चारपाचशेला घेतात असं कळलं ! तो प्रश्न नाही ! पण आपल्या बाबतीत तूही विचार कर ! -- नुसतंच दुरुस्त्या शक्य आहेत, एवढंच नको बघूस ! विचार कर --

अंतरा : आता कसला विचार ? आता पुन्हा भूतकाळात कसं जाता येईल ? आता कसं शक्य आहे ते ?

अनुराग : आत्ताच फक्त शक्य आहे -- आणखी जास्त उशीर केला तर नाही-- आणि भूतकाळात जायचंच नाहीय -- चूक आज कळतेय -- वर्तमानात ! --

अंतरा : या बाकीच्या सगळया दुरुस्त्या होतील -- पण, हे असलं -- आपण घेतलेला निर्णय म्हणजे एखादी वस्तू थोडीच आहे ?

अनुराग : दुरुस्त करता येत असेल तर वस्तूच आहे ! --

अंतरा : नाही, नाही ! नो !

अनुराग : आणि तुझी सुपिरिऑरिटी तरी मी का चालवून घ्यावी -- हाही विचार येतोच हल्ली डोक्यात --

अंतरा : काय असतं -- एक काहीतरी खटकायला लागलं की मग आणखी काही काही तसंच वाटायला लागतं -- कधीकधी, खरा प्रश्न एकच असतो -- खूप दुरुस्त्यांची गरजच नसते !

अनुराग : 'काय असतं ' वगैरे अशी भाषा मला नकोय आता तुझ्याकडून -- एखाद्या विषयातलं किंवा आपल्या कामातलं थोडंफार आपल्याला कळत असतं -- त्या आधारावर एकूण जगण्याबद्दलच जनरल बोलायचं आणि एकमेकांना शिकवायचं ही फॅशनच पडत चाललीय हल्ली ! ' त्याचं काय असतं ' अशी सुरुवात करून बोलणारे फार झालेत हल्ली ! -- संकट आलं, दु:ख आलं की वाट लागते या सगळयांची ! जगण्यातलं आपल्याला फार कळतं अशा पध्दतीनं बोलायची काय योग्यता असते या सगळयांची ?

अंतरा : तू जरा सविस्तर बोललास, पण त्यामुळं, तुझ्याही बोलण्यात तोच दोष असल्याचं उघडं पडतंय ! येतंय का लक्षात तुझ्या ? आणि नाहीतरी काय आहे, संकटं -- दु:खं येणारच आहेत -- ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे जो तो ती पेलेल किंवा वेडा होईल किंवा आत्महत्या करेल -- असं ऑटोमॅटिकच चाललंय ना नाहीतरी सगळयांचंच ? ! जगणं कळणं आणि त्यामुळं वेगळं किंवा अधिक चांगलं जगता येणं हे कुठं दिसतंय ? आणि हे जर नसेलच कुठं तर त्यातल्या त्यात जरा कळल्यासारखं बोललं तरी कुठं बिघडतंय ? तेवढं चालायचंच ! काय असतं --

अनुराग : मग जे. कृष्णमूर्ती आणि रजनीश हे विषय हवेत कशाला ? आपलं आपण बोलावं !

अंतरा : आणि त्यांची वाक्यं आपल्या बोलण्यात आली तरी खरं तर आपलं आपणच बोलत असतो -- ते बोलतात त्या आवाक्यानं आपण बोलतो का ही शंका असतेच !

अनुराग : सगळंच जर असं बेसलेस असेल तर पूर्वी एखादा निर्णय घेतला म्हणून त्यालाच चिकटून राह्यची काही गरज नाही --

अंतरा : निर्णय दोघांनी मिळून घेतला असेल तर तो बदलावा असं दोघांनाही वाटलं पाहिजे --

अनुराग : आणि एकाला तसं वाटलं तर ?

अंतरा : सगळंच बेसलेस आहे इथपर्यंत पोचू शकणाऱ्या माणसानं निर्णय बदलायचा खटाटोप का करावा ?

अनुराग : तोही बेसलेस म्हणूनच करायचा ! गॉट इट ?

अंतरा : ओह ! बास झालं ! निरर्थक !

अनुराग : आणि शिवाय बेसलेस !! ( ती उठून आत जाते. काही क्षणांनी बेल वाजते. तो जाऊन दार उघडतो. ती

आत येते.)

अंतरा : बसवला का बॉयलर ? -- आलेच हं ! ( आत जाते. काही क्षणांनी बाहेर येते.) वा ! झालंय म्हणजे काम ! कुठला घेतला ?

अनुराग : रिनाऊन्ड कंपनीचा नाहीय -- म्हणजे फार प्रसिध्द वगैरे !

अंतरा : मग कुठला आहे ? नंतर कटकटी होतात रे ! मळलेली वाट जास्त सुरक्षित असते !

अनुराग : आपण कुठे आहोत पण मळलेल्या वाटेनं जाणारे ? आणि हा का घेतला हे आधी समजून घे ना !

अंतरा : बरं, सांग --

अनुराग : तांबं महाग झाल्यामुळं रिनाऊन्ड कंपन्या आता आत स्टीलचा टँक वापरतायत -- यांची तांब्याची टाकी आहे -- रिसेलच्या दृष्टीनं तांबं असणं चांगलं आणि आरोग्याच्या दृष्टीनंही ! यालाही आयएसआय मार्क आहे आणि हीही एक आयएसओ नाईन थाऊजन्ड कंपनी आहे ! किंमत जरा कमी आहे, गॅरंटी पिरिअड जास्त आहे ! आपल्या शहरातली कंपनी आहे !

अंतरा : जी वस्तू पंधरावीस वर्षं वापरायची आहे तिच्या रिसेलचा कसला विचार करतोस ? वापरायला चांगलं काय आहे, हे बघ ना !

अनुराग : तांबं चांगलं ! यात पाणी लौकर गरम होतं ! वीज वाचते ! आयुर्वेदाप्रमाणे आरोग्यालाही चांगलं !

अंतरा : सर्वगुणीच म्हणजे ! पण मला हे पटत नाही ! स्टँडर्ड मान्यताप्राप्त मालच घ्यावा !

अनुराग : आयएसआय आणि आयएसओ नाईन थाऊजन्ड !

अंतरा : बरं, ठीक आहे, बघू वापरून !

अनुराग : नाऊ, देअर इज नो गोईंग बॅक !

अंतरा : मला आपलं वाटलं ,निदान मोबाईलवर बोलायचंस तरी ! कंपनी ठरली होती आपली !

अनुराग : फिटिंग करून घेताना त्यात इन्व्हर्टरचीही सोय करून घ्यावी असं तुला वाटलं तेव्हा माझ्याकडेही मोबाईल होताच ! तूं बोललीस त्या वेळी ?

अंतरा : अच्छा ! सॉरी -- पण, मी ठरलेलं काही बदलत नव्हते ! तू ठरलेलं बदलूनही ' नो गोइंग बॅक' म्हणतोयस !

अनुराग : आनंद इतकाच म्हणायचा की इतक्या दुरुस्त्या त्या मानानं खूप कमी वादविवादात पार पडल्या !

अंतरा : निर्जीव, उपयोगाच्या वस्तू त्या ! त्यांच्यासाठी कशाला आपण धोक्यात यायचं ?

अनुराग : सजीवांसाठी एक वेळ ठीक आहे ! अं ?

अंतरा : तुझ्यात ना, काहीतरी बिघाड होत चाललाय हल्ली ! ( उठून आत जाते.)

अनुराग : लक्ष द्यावं लागतं बिघाडाकडे ! टाळाटाळी करून आपोआप दुरुस्त होत नसतो तो ! बिघाड !

अंतरा : ( आतूनच -- ) काय असतं आणि कसं असतं असं बोलायची फॅशनच पडत चाललीय हल्ली !

अनुराग : झाली परतफेड ! आता जेवून झोप शांत !

अंतरा : ( आतूनच -- ) थँक यू फॉर द गाईडन्स ! या आत ! जेवण करून घेऊ !

अनुराग : ( दोन क्षण जातात. मग जणू स्वत:शीच -- ) वेड्यांचा बाजार चाललाय तिच्यायला ! ( आत जातो. काही क्षणांनी दोघेही बाहेर येतात.) आता गरम पानी काढून दाखवलं आहे -- काय प्राब्लेम नाही --

अंतरा : अहो, पण बॉयलर घेतल्यावर पहिल्याच दिवशी कंम्प्लेंट करावी लागावी ? त्यातही, तुम्ही लगेच त्या दिवशी आला नाहीत, दुसऱ्या दिवशी, आज आलात -- आणि बॉयलरमध्ये पाणी नुसतं कोमट होत होतं तर असा बॉयलर लावला कसा इथं आणून ? आणि तुमचं गॅरंटी कार्ड ! झेरॉक्स केलेलं ! तेही -- ती झेरॉक्स तरी नीट आलीय का याचीही काळजी न घेतलेलं ! आणि लिहिलंय काय या गॅरंटीकार्डावर ? विक्रेत्याचा सहीशिक्का असल्याशिवाय हे ग्राह्य धरलं जाणार नाही ! मग सहीशिक्का कुणी मारायचा ? का आता आम्ही पुन्हा दुकानात जाऊन आणायचा मारून ? आणि हे गॅरंटीकार्ड आत पॅकिंगमध्ये ठेवता तुम्ही ! इतकं फडतूस गॅरंटीकार्ड मी माझ्या आयुष्यात पाहिलेलं नाही ! खरंच आयएसओ नाईन थाऊजन्ड आहे का कंपनी तुमची ? मला तर ही सगळी बनवाबनवीच वाटतेय ! नुसतं वेष्टनावर छापायला काय जातंय ! मी पाळंमुळं खणून काढीन तुमच्या कंपनीची ! सांगा तुमच्या मालकाला !

अनुराग : मालकाशी बोलायचा आमाला काय चान्स नसतो -- आमी कंम्प्लेंट डिपार्टमेंटच्या सायबाशी बोलतो – आमचं काम दुरुस्तीचं आहे --

अंतरा : नव्या गोष्टी दुरुस्त करत फिरता का काय ?

अनुराग : आमाला बोलून काय उपेग नाही -- कंपनीचा फोन दिलाय -- कंम्प्लेंट डिपार्टमेंटला मीरचंदानी सायेब आहेत -- त्यांच्यासंगं बोला -- आनी बॉयलरचा काय प्राब्लेम नाही -- निसती एक मिंटाची □डजस्टमेंट होती -- आनी गरम पानी येतंय -- बघितलं की तुमी -- एक सही लागंल हितं --

अंतरा : मी कुठं सहीबिही करणार नाहीय -- जर का आता पुन्हा काही प्रॉब्लेम आला तर मी पूर्ण छडाच लावीन -- सांगा तुमच्या सायबाला -- तुमच्या कंपनीचं सगळंच संशयास्पद वाटतंय मला -- टँक तरी कॉपरचा आहे का ?

अनुराग : आहे हो -- जाऊ का ?

अंतरा : हं -- ( अनुराग बसतो.) यासाठी म्हणत असते मी की रिनाऊन्ड कंपनीच हवी ! आलं लक्षात ?

अनुराग : ठीक आहे, काहीही प्रॉब्लेम येणार नाहीय -- आणि भांडवल नको करूस किरकोळ गोष्टीचं -- माझी माहिती सोड, पण इतकी उघड उघड चारसोबीसगिरी तशी खूपच अवघड असते ! याला कॉमनसेन्स म्हणतात !

अंतरा : ( क्षणभराने --) इफ वुई आर हॅव्हिंग प्रॉपर सेक्स-प्लेझर, देअर इज नो प्रॉब्लेम ! डु यू □ग्री ?

अनुराग : मला हा प्रश्न अर्धवट वाटतोय, त्यामुळं, उत्तर अर्धवट असेल -- यस ! यू आर राईट !

अंतरा : म्हणजे, पूर्ण खरं नाही ! तुला काय वाटतं की निसर्गाची किंवा सत्याची इच्छा आहे की मानवजातीचं सातत्य राहावं -- म्हणून मुलं होत राहावी -- सॉरी ! हीही आपली कल्पनाच असण्याची शक्यता आहे ! काहीही फरक पडत नाही ! गरज नाही ! आपापल्या मनाच्या पध्दतीतून बाहेर पडायचा प्रश्न आहे ! आणि नकार दिला समजा असं बाहेर पडायला, तर खोटं जगा ! मन आणि शरीर या वेगवेगळया गोष्टी नाहीतच -- हे तर शास्त्रसिध्दच आहे ! मग, मनानं प्रत्येक स्त्री अनेक पुरुषांशी संभोग करते -- हे एक तर तुम्हाला कळतच नसावं किंवा तुम्ही दुर्लक्ष करत असला पाहिजेत ! सेक्स-प्लेझर ही गोष्ट आपण अहंकाराशी जोडलेली ठेवल्यामुळं नीतीबीतीचे प्रश्न येतात !

अनुराग : तो विषयच वेगळा आहे -- तो आपला मुद्दाच नाहीय -- स्त्रीपुरुष समानतेचे विचार सारखे डोक्यात वागवत राहिल्यानं मधेच तू काहीही असंबध्द बोलतेस ! मला असं वाटतं की मूल हवंच ! मुलगा किंवा मुलगी ! ते महत्त्वाचं नाही ! ही सगळी पुनरुत्पादनाची यंत्रणा का, कशासाठी -- आपल्याला माहिती नाही -- ती एकच गोष्ट स्वतंत्रपणे नाकारता येत नाही -- मला वाटतं, मूल असावं ! यस ! असावं ! आता वाटतं !

अंतरा : बरं, ते बघू -- वॉशिंग मशीनचं राहिलंय अजून -- सांगितलंयस का तू कुणाला ?

अनुराग : सांगितलंय -- फोन करून येईल तो माणूस -- संध्याकाळी सात नंतर येईल --

अंतरा : चला, म्हणजे सगळंच नीट झालं असं होईल ! -- आणि बरं झालं एका दृष्टीनं -- ओघाओघात सगळंच काम झालं -- आणि मुख्य म्हणजे, मागच्या अनुभवांसारखं झालं नाही -- माणसं बरी मिळाली !

अनुराग : आता सगळं नीट आहे या समाधानात खरंच मला राहता येईल का -- सॉरी -- मला नाही वाटत असं --वरवरच्या दुरुस्त्या नीट होतायत ... पण, मुख्य काहीतरी राहतंय ...

अंतरा : दु:ख तयार करणाऱ्या मनाची लक्षणं आहेत ही -- आपणच प्रॉब्लेम आहे म्हणायचं आणि तो भोगत बसायचं --

अनुराग : तुझं सगळं हे ज्ञान तुझ्यावरच उलटू शकतं ! -- मी टोक गाठायला लागलो तर ... हे तुझ्या लक्षातही येत नाही ! -- किती आडमुठं मन -- ( घड्याळात पाहून -- ) साडेसात झालेत -- येईलच तो --

अंतरा : हं, या -- ते तिकडे गॅलरीत ठेवलंय मशीन -- ते घ्या बघून -- ( अनुराग गॅलरीकडे जातो. मशीन हलवल्याचे आवाज. काही क्षणांनी परत येतो.) हं -- काय झालंय ?

अनुराग : ( अगदी शांत बोलणे -- ) ड्रम धडकून धडकून पत्रा उचकटलाय सगळा -- दोन ठिकाणी तर फाटलायच -- एकूण बॉडी गंजलीय पण -- हे असं दुरुस्त होणार नाही -- बॉडी बदलावी लागेल --

अंतरा : काय झालं काय पण त्याला अचानक ? इतके दिवस तर नीट चाललं होतं --

अनुराग : तुमच्या वापरण्यात काही बदल केला काय ?

अंतरा : बदल काय होऊ शकतो ? कपडे मशीनमध्ये टाकायचे, झाकण लावायचं आणि आपल्याला पाहिजे तसं ॲडजस्ट करून सुरू करायचं ! -- आणखी काय ?

अनुराग : कपडे कसे टाकता ते सांगता जरा ?

अंतरा : हां, त्यात मी अलिकडं केला होता हं मात्र थोडा बदल ! -- आधी जरा वेळ कपडे साबणात भिजत टाकायचे आणि मग मशीनमध्ये टाकायचे असं सुरू केलं होतं मी -- कपडे भिजले म्हणजे जास्त चांगले निघतील म्हणून --

अनुराग : कपडे हातानं शक्य तेवढं पाणी काढून बोळा करून टाकत असाल --

अंतरा : हो --

अनुराग : तेच कारण आहे -- तुमचा हेतू चांगला आहे पण मशीनला नाही चालत तसं -- कपडे फिरण्यासारख्या अवस्थेत नसले किंवा एकाच बाजूला साठले तर ड्रमचा बॅलन्स जातो -- आणि एकदा का तो बॉडीवर धडकला की उलटीकडंही धडकतो आणि धडकतच राहतो --बॉडीची वाट लागलीय -- बघा की !

अंतरा : बॉडी नीट या मापाची करेक्ट मिळते का ?

अनुराग : त्याची काळजीच करू नका -- मशीन नव्यासारखं होईल -- आत बाकी काहीच प्रॉब्लेम नाहीय --

अंतरा : खर्च किती येईल ?

अनुराग : बरोब्बर दोन हजार -- सोळाशेची बॉडी, तीनशे सर्व्हिस चार्ज, शंभर ट्रान्सपोर्ट -- यात काहीच कमी होणार नाही --

अंतरा : कधी करताय मग ?

अनुराग : ( स्वतःच्या भूमिकेतून -- ) मला पुन्हा उशीरा जायला जमणार नाहीय ऑफिसात ! --

अंतरा ठीक आहे, मग उद्या, याच वेळी येऊन काम पूर्ण करू शकाल ?

अनुराग : हो, करू शकेन -- या जुन्या पत्र्याचे तुम्हाला भंगारवाल्याकडून पन्नाससाठ मिळतील --

अंतरा : ठीक आहे, या मग उद्या -- असंच --

अनुराग : डव्हान्स द्या --

अंतरा : अहो, विश्वास नाही का काय आमच्यावर ?

अनुराग : विश्वासाचा प्रश्न नाही -- पण कधीकधी दुसऱ्याच माणसाकडनं करून घेतात लोक काम आणि आम्ही गेल्यावर म्हणतात -- झालं काम !

अंतरा : तसं नाही करणार आम्ही -- मुळात आम्हाला वेळच नाहीय -- या तुम्ही उद्या --

अनुराग : चालेल -- येतो मग --

अंतरा : हं -- ( अनुराग बसतो. आळोखेपिळोखे देतो. मग निश्चल बसून राहतो. अंतरा आत जाऊन परत येते.) हं -- आता सगळं नीट झालेलं आहे -- हे व्हायचंय, ते व्हायचंय, असं काही नाहीय आता --

अनुराग : मी माझ्या बॉसकडून अपमानित होऊ नये म्हणून काळजी घेतेस तू, जमेल तेव्हा, पण मी तुझ्याकडूनच अपमानित होत असलो तर --

अंतरा : काहीतरी काल्पनिक प्रॉब्लेम नको काढूस -- तुझा बॉस आऊटसायडर आहे -- आपण इनसायडर आहोत -- आपल्याआपल्यात काही होणं म्हणजे मनातल्या मनात आपले आपण कधीकधी हर्ट होतो की नाही -- तसं समजायचं ते -- आपण एकच आहोत असं धरून आपल्याआपल्यातले प्रॉब्लेम्स सहन करायचे !

अनुराग : एकमेकांना कोऑपरेट करत बऱ्याच गोष्टी हँडल करत, दुरुस्त करत जातो आपण, पण, मला तर कायमस्वरूपी एक पराभूत भावना भरून असल्यासारखं वाटतं मनात -- हे सगळं बारीक, मोठं आपण नीट करत नेतोय, पण मुख्य काहीतरी राहतंय असं वाटत राहतं --

अंतरा : म्हणजे आपण जेव्हा निर्णय घेतला तेव्हासारखी नाही राहिली तुझी मनस्थिती -- म्हणजे एक प्रकारे मला विरोधीच झाली -- हा आता अन्यायच आहे ना माझ्यावर -- मला चालवूनच घ्यावं लागणार आहे हे !

अनुराग : तरीही प्रत्यक्षात घडणार आहे ते तुझ्या ठरलेल्या प्लॅनप्रमाणेच ! -- बदल काय होणार आहे ? अजूनही तू मला आवडतेसच ! ... प्रेमच म्हणू याला हवं तर ... अजूनही घटस्फोटासारखे विचार डोक्यात येत नाहीत ...

अंतरा : आपण विचार करून निर्णय घेतला होता-- टोकाचे विचार नकोतच !-- प्रामाणिकपणा तरी लागेलच आता --

अनुराग : तेव्हाही मी प्रामाणिकच होतो आणि आजही मी प्रामाणिकच आहे -- मी त्या जुन्या निर्णयाशी प्रामाणिक राहावं की स्वत:शी -- हा प्रश्न आहे --

अंतरा : असं तर मग लहरीपणा आणि फसवाफसवीही समर्थनीय ठरेल ! आणि व्यभिचारही !

अनुराग : माझ्या आत्ताच्या वागण्याला ही उदाहरणं !!

अंतरा : आणि तू तुझ्या निर्णयाशी किंवा तुझ्याशी स्वत:शी प्रामाणिक राह्यचं बोलतोयस पण माझ्याशी प्रामाणिक राह्यचं काय ?

अनुराग : वकिली पॉईंट काढू नकोस वेडपटासारखे -- अंडरस्टँड द सीरीयसनेस ! मूल होऊ द्यायला अडथळा करणं -- पतीनं किंवा पत्नीनं -- हे घटस्फोटाचं कारण होऊ शकतं -- कायद्यानं ! लक्षात घे !

अंतरा : हे तर आता सगळं पेंडिंगच ठेवावं लागेल -- याव्यतिरिक्त आता काय घडू शकणार आहे ? फार तर बल्ब-ट्यूब्स बदलाव्या लागतील, रंग जुना झाला की पुन्हा द्यावा लागेल, फर्निचर पॉलिश करून घेणं, माळे झाडून घेणं, झुरळं-पाली होऊ नयेत म्हणून औषध मारून घेणं -- हे सगळं वेळोवेळी सहज जमण्यासारखं आहे ! --

अनुराग : मला तर वाटतंय माझा यातलाही उत्साह कमी कमी होत जाईल हळू हळू -- आणि विचित्र म्हणजे हे सगळं असं असूनही या सगळयाशिवाय जगता येईल का -- असा प्रश्न येतोय डोक्यात --

अंतरा : लग्न झाल्यावर कालांतरानं एखाद्याला काही आजार होऊ शकतो -- अपघात होऊ शकतो -- एनिथिंग अनएक्स्पेक्टेड कॅन हॅपन -- तसंच हे आहे -- तुझी मनस्थिती बदलणं -- तुझ्या अपेक्षा, तुझे प्रश्न बदलणं --

अनुराग : तसं नाहीय हे -- तू सहकार्य दिलंस तर आनंदानं बदल शक्य आहे --नाहीतर मला आता त्या विचित्र प्रश्नाचाच मार्ग उरलाय ! -- या सगळयाशिवाय जगणं शक्य आहे का ?

अंतरा : किंवा ठरल्याप्रमाणे आनंदानं राहणं -- ( तो काही बोलत नाही.) नाही का ? (तो गप्पच --) फक्त फ्रीझचा दरवाजा जरा डाव्या बाजूनं घसरलाय -- पण बंद होतोय नीट -- ते काही एवढं अर्जंट नाही -- सवडीनं बघू --

अनुराग : अर्जन्सी निर्माण झाल्याशिवाय, नाही तरी, आपण करतोच काय ? ( शांतता.) अर्जन्सी ! लक्षात घे ! ( शांतता. हळूहळू अंधार होत जातो ... पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा दोघेही बसलेले ... जणू आपापल्या विचारांत ... काही क्षणांनी ... )

अंतरा : ( स्वगत -- ) या सगळया दुरुस्त्या नुसत्याच बाहेर चालल्यायत की आमच्या पति-पत्नी या नात्यातही चालल्यायत ? बिघाड आहेच पण दुरुस्त्यांचे प्रयत्न फक्त अनुरागच करतोय -- मी कुठाय सामील त्यांत ? पण माझी चूक तई काय आहे ? की हा नुसताच माझा अहंकार आहे ? त्याची तरी काय चूक आहे ? हे नातं म्हणजे काय फक्त एखाद्या कराराची अंमलबजावणी ? आता त्याला काही वेगळं वाटतंय पण म्हणून तो गुन्हगार ठरेल ? त्याच्या अपेक्षा बदलूनही तो मला दूर करायचा विचारही करत नाहीय -- मीच दुरुस्त होऊ शकेन का याचा प्रयत्न करतोय -- नात्यातल्या प्रेमाला धक्काही लावत नाहीय तो -- फक्त स्वत:मध्येच करत बसलाय दुरुस्त्या -- ठ्हरलेल्या कलमाच्या दबावाखाली -- या बदललेल्या परिस्थितीत त्याची होणारी तगनग मी नुसती पाहात बसावी ? मी नाही बदलू शकत ? काय होईल मी माझ्या महत्त्वाकांक्षेला लगाम घातला तर ? माघार घेणं होईल, तडजोड करणं होईल की पुन्हा एकदा स्त्री म्हणून पराभव स्वीकारणं होईल ? स्त्रीवर अन्याय होण्याच्या पद्धतीला पुन्हा खतपाणी घालणं होईल ? आहे या टप्प्यावर मला थांबता नाही येणार ? माझ्या अनुरागसाठी ? ( उघड -- ) अनुराग, मला तुझ्याशी काही बोलायचंय -- ( तो पाहतो -- ) मी गोंधळलेय -- मला तुझी मदत हवीय --

अनुराग : हं -- बोल --

अंतरा : असं काही सुचलं तर सांग की स्त्रींचं स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा राहिली पाहिजे आणि आपल्यातला हा प्रश्नही मिटला पाहिजे -- आपल्याला प्रेमानं, सुखात, एकमेकांचे प्रेमिक म्हणूनच जगताही आलं पाहिजे --

| | |
|---|---|
| अनुराग : | म्हणजे तुझा हट्ट चालू ठेवून तुला समजुतदारही होता आलं पाहिजे -- असंच ना ? आणि कशाला हट्ट म्हणावं, कशाला समजुतदारपणा म्हणावं, हे कुणी ठरवायचं ? कुणी समजुतदारपणाला अन्याय सहन करणंही म्हणू शकेल -- |
| अंतरा : | ( काही क्षणांनी -- ) मी विचार केला अनुराग -- आत्ता तू जो हा अन्याय वाटण्याचा मुद्दा सांगितलास त्या अंगानंही पाहतेय मी माझ्याकडे -- मला नाही वाटत आहे मी तुझं ऐकणं हे अन्यायाचं -- उलट मी बदलले नाही तर तो तुझ्यावर -- आपल्यावर अन्याय होईल, असंच वाटतंय -- |
| अनुराग : | मी तुला अंतर देणार नाही -- तू दु:खी न होता, तुला योग्य वाटेल ते कर -- |
| अंतरा : | मूल होऊ देऊ या आपण -- ( अनुराग काहीसा चकितपणे पाहतोय -- काही क्षणांनी -- ) त्यामुळं काही प्रश्न निर्माण झाले तर त्या त्या वेळी ते सोडवत जाऊ -- त्या त्या वेळी लागतील त्या दुरुस्त्या करत जाऊ -- मला तू हवा आहेस -- माझा म्हणून पूर्ण -- माझ्यामुळं तुला सतत नाराजीत जगावं लागणं, हे मला नाही आवडणार, हे समजतंय मला -- मीही अस्वस्थ, नाराज, निराश होत जाईन -- मला तुझी प्रेमाची स्त्री -- तुझी प्रिय पत्नी म्हणूनच जगायचंय -- |
| अनुराग : | ( उभा राहून -- ) खूपच छान आहे हे -- ( तीही उभी राहते -- रडू लागते -- अनुराग पुढे येतो -- ) काय झालं अंतरा ? काळजी नको करूस कसलीही -- |
| अंतरा : | माझं चुकत होतं, अनुराग, मी तुझी आहे -- तुझीच -- ( तो तिला जवळ घेतो --तिच्या केसांवरून हात फिरवत राहतो ... काही क्षणांनी पडदा पडत जातो ... ) |

**-- समाप्त –**

--- ००० ---

**सूचना :- सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखकाची लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता --

चं.प्र. देशपांडे,

३, स्नेहदीप अपा., चिंतामणीनगर,

सहकारनगर नं. २, पुणे - ४११००९

फोन -- २४२२७८४७. / २४२२७८४८. / ९३७१००५७७३.